नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २०४ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ०४ जुलै २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

बदल्यांचे नियम बदलणार?

मुंबई : (स. गांवकरी)

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन, योग्य प्रकारे, जलद गतीने नस्तींचा निपटारा आणि शासकीय कामकाजात पारदर्शकतेसाठी शिफारसी करण्यासाठी दोन्ही सभागृहातील सदस्यांची समिती गठीत करण्यात येईल, अशी घोषणा सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी मंत्री अँड आशिष शेलार यांनी शुक्रवारी विधानसभेत केली.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध सुधारणा विधेयक हे अशासकीय विधेयक सुधीर मुनगंटीवार यांनी मांडले. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या नियमानुसार निश्चित करण्यात आलेल्या वेळेत करण्यात याव्या. कर्मचाऱ्यांच्या कामाचा मुल्यांकन अहवाल लिहिताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात यावा. या सर्व विषयांत सुसुत्रता येण्यासाठी संबंधित विषयांचा अभ्यास करून सरकारला शिफारशी करण्यासाठी दोन्ही सभागृहातील वरिष्ठ सदस्यांची समिती गठीत करण्याची मागणी केली. मंत्रालयातील आणि मंत्री कार्यालयातील नस्तीचा निपटारा करण्यासाठी ४५ दिवसांची मर्यादा असावी, अशी आग्रही मागणी मुनगंटीवार यांनी केली होती.

या चर्चेला सामान्य प्रशासन प्रभारी मंत्री अँड. आशिष शेलार यांनी उत्तर दिले. शासकीय कामात अधिक पारदर्शकता यावी म्हणून शासनाने सन २०२५ मध्ये कर्मचाऱ्यांचा बदल्यांचा अद्यादेश काढला. पुढे त्यामध्ये अनेकदा सुधारणा करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या कामाचे मुल्यांकन व्हावे म्हणून गोपनीय अहवाल तयार करण्याची पद्धत अवलंबली आहे. प्रशासनात पारदर्शकता यावी, जलद गतीने काम व्हावे म्हणून नस्तींचा निपटारा करताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. बदल्यांमध्ये सुसुत्रता, पारदर्शकता व नस्तीचा निपटारा जलद गतीने व्हावा म्हणून दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची समिती स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा मंत्री शेलार यांनी केली.

बेकारी निर्मूलनासाठी समिती

मुनगंटीवार यांनी महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक २०२५ मांडले. या अशासकीय विधेयकावर अभिजित पाटील, सिद्धार्थ खरात आदींनी सूचना केल्या. त्याला कैशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी उत्तर दिले. सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात येईल, ही समिती बेरोजगारी, बेकारीवर उपाययोजना सुचवेल. ग्रामीण भागातील वाढत्या बेकारीबाबत प्रशिक्षण, कौशल्य विकासाच्या योजना राबविण्यात येतील. आयआयटी सक्षम केल्या जात आहेत. बंद पडलेले उद्योग बेरोजगारांना चालविण्यासाठी देता येतील का, याची चाचपणी सुरू आहे, अशी माहिती लोढा यांनी दिली.

स्टिंगवरुन विधिमंडळात प्रश्न

'स्टिंग', 'रेड बुल', 'पेप्सिको'ला FDA ची नोटीस

मुंबई : (स. गांवकरी)

स्टिंग एनर्जी ड्रिंकमुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा मुद्दा आज राज्य विधिमंडळ सभागृहात उपस्थित करण्यात आला. श्रागोंदाचे आमदार विक्रम पाचपुते आणि दौंडचे आमदार राहुल कुल यांनी याविषयी प्रश्न उपस्थित केला. यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शैक्षणिक संस्थेपासून किमान ५०० मीटरच्या परिसरात एनर्जी ड्रिंक विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करुन नमुने घेणे आणि आक्षेपार्ह जाहिरातीविरुद्ध कारवाई करण्याबाबत ऑक्टोबर २०२४ आणि जानेवारी २०२५ मध्ये दिल्याचे उत्तर दिले. यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी राज्यात सुरू असलेल्या सेव्ह ड्रग, सेव्ह फूड मोहिमेबाबत पत्रकार परिषदेत पेप्सिको, रेड बुल, स्टिंगसारख्या कंपन्या नोटीस बजावल्याची माहिती दिली. "बाजारात जे तथाकथित (सो-कॉल्ड) एनर्जी डिंक्स मिळतात, या सो कॉल्ड एनर्जी ड्रिंक्सच्या कंपन्यांना एनर्जी ड्रिंक्स हा शब्द लिहता येत नाही. याबाबत अन्न व औषध प्रशासनाने ३० जून रोजी त्यांना नोटीस पाठवल्या आहेत.

सस्नेह निमंत्रण

'आरोटे हॉस्पिटल'
आता नुतन स्वरुपात स्थलांतरीत होत आहे.

शिवम् मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

या नूतन लोकसेवेचा

लोकार्पण सोहळा

रविवार, दि. ५ जुलै २०२६ । सकाळी १०.३० वाजता

उपलब्ध सुविधा

- जनरल मेडिसिन
- जनरल सर्जरी
- ऑर्थोपेडिक्स
- कार्डिओलॉजी
- गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी
- नेफ्रोलॉजी व युरोलॉजी
- न्युरोलॉजी
- कॅथलॅब (नियोजित)
- पॅथोलॉजी लॅब
- डिजिटल एक्स-रे
- एन्डोस्कोपी
- सोनोग्राफी
- सी.टी. स्कॅन (नियोजित)
- न्यूरोसर्जरी

50 बेडचे सुसज्ज मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल

- 50 बेडची आधुनिक व सुसज्ज सुविधा
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- 24x7 इमरजन्सी सेवा

ठिकाण
फ्लोरा टाऊनशीप, SMBT डेंटल कॉलेज समोर,
पुणे-नाशिक हायवे,राजपाल सुपरशॉपी मागे, घुलेवाडी, संगमनेर

- शुभहस्ते आजी-आजोबा
- सन्माननीय मान्यवर

लोकनेते मा. बाळासाहेब थोरात
मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.आ. सत्यजीत तांबे
सदस्य, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य
मा.सौ. मैथिलीताई तांबे
नगराध्यक्षा, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर
मा.श्री. सिताराम राऊत
मा. सदस्य, जिल्हा परिषद, अ.नगर
मा.श्री. अरुण पाटील कडू
रयत शिक्षण संस्था
मा. श्रीमती निर्मलाताई राऊत
सरपंच, ग्रामपंचायत घुलेवाडी
मा.डॉ. योगेश गेठे
अध्यक्ष, IMA, संगमनेर
मा.डॉ. कामेश टावरे
तालुका वैद्यकीय अधिकारी, संगमनेर

मा.आ. अमोल खताळ पाटील
आमदार, संगमनेर विधानसभा
मा.आ.डॉ. किरण लहामटे
आमदार, अकोले विधानसभा
मा.श्री. वैभव पिचड
मा. आमदार, अकोले विधानसभा
मा.श्री. साहेबराव नवले
अध्यक्ष श्रमिक उद्योग समूह
ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख
समाज प्रबोधनकार
ब्र.कु. राजयोगिनी नलिनी बहेनजी
संचालिका, मीरा सोसायटी, पुणे
मा.डॉ. राजकुमार जऱ्हाड
वैद्यकीय अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय, घुलेवाली
मा.डॉ. संदीप कचेरिया
वैद्यकीय अधिकारी, ग्रामिण रुग्णालय, घुलेवाडी

- निमंत्रक

सौ. विद्या व इंजि. रामनाथ दशरथ आरोटे
डॉ.सौ. स्वप्नाली व डॉ. अतुल रामनाथ आरोटे
डॉ.सौ. स्नेहल व डॉ. अंकुश रामनाथ आरोटे
सर्व डॉक्टर्स व कर्मचारी वृंद (आरोटे हॉस्पिटल, ताजणे मळा, संगमनेर)

- ठिकाण
फ्लोरा टाऊनशीप, SMBT डेंटल कॉलेज समोर,
पुणे-नाशिक हायवे,राजपाल सुपरशॉपी मागे, घुलेवाडी, संगमनेर

टिप : सर्वांना निमंत्रण पत्रिका, सोशल मिडीया, प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक मिडीया, डिजिटल मिडीया याद्वारे कार्यक्रमाची निमंत्रण देण्यात आले आहे तरी न मिळाल्यास हीच निमंत्रण पत्रिका समजुन आवर्जून उपस्थित रहावे ही विनंती.

थोडक्यात पण महत्वाचे

मुथ्था परिवारातर्फे नारायण गावकरांसाठी शीत शवपेटी लोकार्पण

नारायणगाव (स. गांवकरी) : नारायणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते हर्षल मुथ्था,सुयोग मुथ्था व समस्त मुथ्था परिवाराने आपल्या सामाजिक दातृत्वाचा परिचय देत स्व. दादी रखमाबाई नंदरामशेठ मुथ्था यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महावीर भवन, नारायणगाव येथे एका विशेष कार्यक्रमात 'शीत शवपेटी' चे नारायणगावकरांसाठी लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. गणेशमहाराज वाघमारे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये कृषिरत्न अनिलतात्या मेहेर,युवा नेते अमित बेनके,नारायणगावचे उपसरपंच बाबूभाऊ पाटे,माजी जिल्हा परिषद सदस्य माऊली खंडागळे,अशोक गांधी,सुरज वाजगे उपस्थित होते. दुःखाच्या प्रसंगी समाजाच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी ईश्वरसेवा आहे,अनेकदा अत्यंत दुःखद प्रसंगी काही कारणास्तव दूरचे नातेवाईक किंवा आप्तस्वकीय येण्यास विलंब होतो. अशा कठीण वेळी मृतदेहाची हेळसांड होऊ नये आणि कुटुंबाला आपल्या माणसाचे अंतिम दर्शन शांततेत व डोळे भरून घेता यावे, त्यासाठीच ही शीत शवपेटी पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली आहे,असे हर्षल मुथ्था यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद दरेकर यांनी केले.

११ वी कला व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

पाथर्डी (स. गांवकरी) : दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय आदिनाथनगर येथे ११वी कला व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आनंदात पार पडला. या कार्यक्रमासाठी दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे सचिव श्री नितीन शिंदे व अण्णासाहेब शिंदे कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री सुनील वानखडे, दादापाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्री आर.जे टेमकर व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य श्री ए एन काळे, स्टाफ सेफेटरी श्री डि एम गायकवाड व सर्व शिक्षक शिक्षकेतर स्टाफ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य श्री अशोकराव काळे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात असणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. दादापाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाला सामोरे जाऊन उत्तुंग यश प्राप्त करावे, असा संदेश दिला. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे सचिव श्री नितीन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रम यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्री. राजकुमार घुले यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालया बाबत माहिती दिली. या स्वागत समारंभ कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आर. सी. इंगळे यांनी केले. आभार डॉ. बबनराव टिळेकर यांनी मानले.

दुर्गम भागातील तांबे येथे आरोपीवर कारवाई : १९०० ग्रॅम गांजा जप्त

शिवनेरी (स. गांवकरी) : आदिवासी दुर्गम भागातील तांबे आंबेदरा वाडी येथील मुरलीधर धोंडु जोशी यांच्या घराच्या शेजारी असलेले हिरव्या नेटच्या आडोश्याला शेतामध्ये अंमली पदार्थ असलेले गांजाचे झाड अंदाजे वजन १९०० ग्रॅम प्रमाणे त्याची लागवड केल्याचे आढळले . आरोपी मुरलीधर धोंडु जोशी यांच्या विरूध्द गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम १९ ८५ कलम २० (ब) ii (अ), ८ (ब) नुसार गुन्हा नोंद करून कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई स . पो . नी . संदीप मोरे, स. फौ. गिजरे, एच सी महेश भालेराव, पो. शि. दादा पावडे, अमोल सातपुते,कै वोलास केंद्रे, श्रीराम शिंदे, दीपक वणवे या पथकाने कारवाई केली आहे . जुन्नर पोलीस ठाण्यातील हद्दीत अमली पदार्थ वनस्पतींची लागवड व विक्री करु नये.याबाबत कठोर कायदेशीर कारवाई करण्याची माननीय पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी सांगितले आहे.

अहिल्यानगर, संगमनेरसह "या" भागात मुसळधार पावसाचा इशारा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : येत्या १२ जुलैपर्यंत नंदूरबार, धुळे, नाशिक या भागात अतिमुसळधार पाऊस पडणार असून अतिवृष्टी होणार आहे. यामुळे गोदावरी नदीला पूर येणार आहे. राज्यात पावसाचा जोर वाढत जाणार आहे. हा पाऊस ८ जुलैपर्यंत सगळीकडेच असेल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नाशिक जिल्ह्यील निळवंडे, भंडारदरा, गंगापूरचे धरण, उत्तर महाराष्ट्रातील छोट्या धरणांत पाण्याची आवक येण्यास सुरुवात होणार आहे. छोटे – छोटे पाझर तलाव आताच्या पावसातच भरून जातील, असं पंजाबराव डख यांनी सांगितलंय. अहिल्यानगर, संगमनेर, अकोला, संभाजीनगर, जालना, अमरावती, बुलढाणा या परिसरातही आठ दिवसात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. पश्चिम महाराष्ट्रात सोलापूर, जिल्हा, लातूर, सांगली, कोल्हापूर, सातारा या पट्ट्यातही 3 तीन जुलैपर्यंत पावसाला सुरुवात होणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी व्यक्त केला.

तोफखान्यातील जुगार अड्ड्यावर छापा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर शहरातील तोफखाना परिसरात असलेल्या ठाकूर गल्लीत तिरट नावाचा पत्त्यांचा जुगार खेळताना तिघांना तोफखाना पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्या कडून रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. ३० जून रोजी रात्री ९ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. तोफखाना पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथक प्रमुख उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना ठाकूर गल्ली येथे काही इसम जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार उपनिरीक्षक चाहेर पोलीस अंमलदार दिनेश मोरे, भानुदास खेडकर, सतिश शिंदे, सुमित गवळी, सुजय हिवाळे यांच्या पथकाने रात्री ९ च्या सुमारस तेथे छापा टाकला. त्यावेळी राजेंद्र रामनारायण राठोड (रा. ठाकूर गल्ली, तोफखाना), राहुल पोपट अहिरे (रा. भूषणनगर, केडगाव), सागर शंकर कुम्हे (रा. बोल्हेगाव) हे तिघे तिरट नावाचा पत्त्यांचा जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या कडून १२८० रुपये रोख व जुगाराचे साहित्य जप्त केले. त्या तिघांच्या विरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात पो.हे.कॉ. दिनेश मोरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संगमनेर तालुक्यात 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत जनजागृती कार्यक्रम

संगमनेर (स. गांवकरी) : भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) यांच्या देशव्यापी 'खेत बचाओ अभियान' (Khet Bachao Abhiyan - KBA) उपक्रमांतर्गत आयसीएआर-केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था (ICAR-CIRCOT), मुंबई यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात विविध गावांमध्ये दोन दिवसीय शेतकरी जनजागृती कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

अण्णा देशहिता इतकीच आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे

गोरख कल्हापुरे : अण्णा यांच्या उपोषणास जन सेवा ड्रायव्हर पार्टीचा पाठिंबा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

समाज आणि देशाच्या हितासाठी भ्रष्टाचाराच्या विरोधात असंख्य आंदोलने, उपोषणे केली ५ जुलै २०२६ रोजी अण्णा तुम्ही ९० व्या वर्षीही माहिती अधिकार दुरुस्ती कायद्याच्या विरोधात राळेगणसिद्धी येथे उपोषणास बसणार आहात, आपल्या या लोककल्याणकारी आंदोलनाला जनसेवा ड्रायव्हर पार्टी कडून जाहीर पाठिंबा देत आहोत,पण अण्णा देशहिता इतकीच आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे वाटते असे जन सेवा ड्रायव्हर पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष गोरख कल्हापुरे यांनी अण्णा हजारे यांच्या उपोषणास पाठिंबा दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

राळेगण सिद्धी येथे जनसेवा ड्रायव्हर पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी अण्णा हजारे यांची भेट घेऊन पाठिंबा बाबतचे पत्र देऊन या उपोषणाबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष गोरख कल्हापुरे उपाध्यक्ष गोरक्षनाथ कराळे, शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कोतकर, जिल्हा सचिव कैलास कोतकर, ट्रान्सपोर्ट ड्रायव्हर सेवा ट्रस्ट जिल्हाध्यक्ष दत्ता जाधव आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या हातात असलेल्या माहिती अधिकाराचे रक्षण करण्यासाठी वयाच्या ९० व्या वर्षीही लढायला तयार झाले, हा आमचा देशवासियांसाठी तरुणांसाठी खूप मोठा आदर्श असल्याचे या चर्चेदरम्यान स्पष्ट करण्यात आले.

यावेळी अण्णा म्हणाले आंदोलना दरम्यान आरोग्याला जर काही बाधा पोहचली,तर तुमच्यासारखी तरुणपिढी, देशातील सर्व सामान्य नागरिक यांचा पाठिंबा माझ्यामागे आहेच,त्यामुळे मला काही होणार नाही असे सकारात्मक विचार त्यांनी व्यक्त केले.

यावेळी गोरक्षनाथ कराळे म्हणाले तुमच्या आंदोलनाची सरकारने दखल घेतली नाही तर आम्ही जन सेवा ड्रायव्हर पार्टीच्या वतीने तुम्हाला बळ देण्यासाठी आणि सरकारच्या उदासीनतेच्या निषेध करण्यासाठी ठिकठिकाणी तीव्र रस्ता रोको आंदोलने करू. आपल्या उत्तम आरोग्यासाठी आम्ही ईश्वराला प्रार्थना करतो. तसेच आपले हे आंदोलन प्रशासनाला नमते घ्यायला भाग पाडेल असा देखील विश्वास आम्ही सर्वजण व्यक्त करतो. असे श्री कराळे यांनी स्पष्ट केले.

वंचितांसाठी उघडली संगणक शिक्षणाची द्वारे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सध्या अनेक कारणांनी समाजमन असंवेदनशील होत चालले आहे. स्नेहालय सारख्या संस्थांमध्ये आल्यावर मात्र समाजभान पुनश्च जागृत आणि कृतिशील होते ,असे प्रतिपादन इमर्सन कंपनीचे उपाध्यक्ष अजय सावरगावकर यांनी केले. पुणे येथील रोटरी क्लब ऑफ पुणे हिल साईड आणि इमर्सन कंपनी यांनी स्नेहालय संस्थेत विद्यार्थ्यांसाठी प्रगत संगणक प्रशिक्षण केंद्र साकारले. मुलांचा स्नेहस्पर्श छात्रावास आणि मुलींचे पुनर्वसन संकुल येथे ४२ संगणक संचांसह हे केंद्र सुरू करण्यात आले. इमर्सन आणि रोटरी क्लब ऑफ पुणे हिल साईड यांनी फर्निचरसह संगणक प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या सर्वसाधारणांची पूर्तता केली. या केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी रोटरी क्लब पुणे हिल साईडचे अध्यक्ष राजेंद्र म्हेत्रे, पुणे येथील रोटरी क्लब (क्रमांक 3131 चे)प्रांतपाल संतोष मराठे, मराठवाडा आणि नगर येथील रोटरी क्लब (क्रमांक 3132 चे) प्रांतपाल सुधीर लातुरे , इमर्सन कंपनीचे संचालक रो.अभय बनसोड, हिलसाईड रोटरी क्लबचे प्रकल्प प्रमुख संतोष होनकरपे आणि सचिव चंद्रशेखर महामुनी, स्नेहालय संस्थेचे मुख्य पालक रो.राजीव गुजर, सचिव डॉ. प्रीती भोम्बे आदी उपस्थित होते.

इमर्सन कंपनीतर्फे ४२ सीपीयू तर रोटरी क्लबतर्फे कीबोर्ड, मॉनिटर, माऊस , फर्निचर आणि अन्य संसाधने उपलब्ध करून देण्यात आली. या निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले. स्नेहालय संस्थेच्या स्नेहांकुर दत्तक विधान केंद्र, मानसग्राम मानसिक आरोग्य प्रकल्प, हिम्मतग्राम कृषी आणि रोजगार प्रकल्प, स्नेहालय इंग्रजी विद्यालय , केरिंग फ्रेंड्स रुग्णालय या प्रकल्पांना रोटरी सदस्यांनी भेटी दिल्या.

प्रशांत खत्री यांच्याकडून चर्मकार व्यावसायिक यांना साहित्य वाटप

शिवनेरी : (स. गांवकरी)

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१ अंतर्गत कार्य रोटरी क्लब जुन्नर शिवनेरीच्या रौप्य महोत्सवी २०२६ / २७ वर्षी या कार्यक्रम प्रसंगी पदग्रहण स्विकारताना अध्यक्ष रो. प्रशांत खत्री, सचिव तथा पत्रकार रो. पवन गाडेकर व कोषाध्यक्ष रो.विकी पंजवानी यांनी सर्व चर्मकार व्यावसायिक बंधू यांना छत्री व संबंधित साहित्य वाटप तसेच यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला अशी माहिती अध्यक्ष रो. प्रशांत खत्री यांनी दिली.

सन २०२५ / २६ या कालावधीमध्ये तीर्थक्षेत्र पंढरपूर, कृष्णराव मुंढे विद्यालयात व जुन्नर तालुक्यातील आदिवासी शाळेमध्ये सुसज्ज सुलभ शौचालय बांधले. वृक्षारोपण, डॉक्टर डे, दहावीतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अकराशे पेक्षा जास्त आयडियल कुपन्स वाटप, आरोग्य शिबिर, आदिवासी दुर्गम भागातील शाळेतील भिंतींना कलर व सामाजिक उपक्रम वर्षभर राबविले असे मावळत्या अध्यक्ष रो. मिलिंद घोडेकर यांनी सांगितले.

सन १९८६ ते २०२६ पर्यंत रोटी रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरी चा सामाजिक उपक्रम कार्यकाळ पाहिलेला आहे. सन १९६९ मध्ये जुन्नर तालुक्यात कै. डॉ. रमेश जुन्नरकर व त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी जुन्नर तालुक्यात रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरी रोपट उभं केल. सन १९८५ मध्ये रोटरी क्लब चा सभासद आमदार झाला त्यांचे नाव माजी आमदार वल्लभ बेनके आहे. तालुक्यात रोटरी क्लबच्या माध्यमातून विकास झाला असे गौरव उद्गार रोटरी भूषण डॉ. सुनील शेवाळे यांनी याप्रसंगी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार व राष्ट्रगीताने करण्यात आली आहे. उद्योजक रो. विनायक कर्पे, प्रा.रो. शिवाजी टाकळकर इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पत्रकार रो. विलास कडलग व आभार पत्रकार तथा सचिव रो.पवन गाडेकर यांनी मांडले आहे.

याप्रसंगी माजी गटविकास अधिकारी हेमंत गरीबे, माजी संचालक देवराव मुंढे, ज्येष्ठ नेते बाबा परदेशी, समाजसेविका उज्वला शेवाळे, सरपंच दत्ता गवारी, नगरसेवक अनिल रोकडे, नंदू तांबोळी व ॲड. प्रशांत सराईकर, माजी नगरसेवक मधुकर काजळे, कुमशेत ग्रामस्थ, जुन्नर नगर परिषदेचे आजी व माजी सर्व विभागाचे अधिकारी, पत्रकार बांधव, इतर पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थी अर्कस लाहोरकर, श्रेया कर्पे, सेजल घोडेकर व इतर विद्यार्थी यांना ट्रॉफी, शाल देऊन गौरविण्यात आले. दत्तात्रय गायकवाड, रामदास नवले, एकनाथ थोरात, जयसिंग नवले, संतोष चव्हाण, काशिनाथ नवले, रवींद्र शिंदे, तानाजी गायकवाड, निवृत्ती शिंदे, ज्ञानेश्वर नवले, संजय नवले इतर चर्मकार बांधवांना छत्री व संबंधित साहित्य वाटप करण्यात आले.

आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा ४८ वा रेझिंग डे उत्साहात

आक्रमक अकरा मराठा युनिटचे देशसेवेच्या कार्यात मोठे योगदान - डॉ.सोमेश्वर गायकवाड

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

"आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा"४८ वा रेझिंग डे अहिल्यानगर मध्ये मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला आहे. देशसेवेच्या कार्यात आक्रमक अकरा युनिटचे मोठे योगदान आहे.

स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून सर्व माजी सैनिक व परिवार एकत्रित आल्याचा आनंद होत आहे.निवृत्तीनंतर सर्वांनी आपल्या आरोग्याची नियमितपणे काळजी घ्यावी. प्रत्येक वर्षी प्राथमिक आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे. सेवानिवृत्ती नंतरही एकजूट राहिले तर माजी सैनिकांचे प्रश्न सुटतील. देशसेवा सोबतच सामाजिक कार्यातही माजी सैनिक आघाडीवर आहेत.असे प्रतिपादन कर्नल डॉ.सोमेश्वर गायकवाड यांनी केले आहे. संभाजी नगर रोड येथील हॉटेल आकाश येथे "आक्रमक अकरा मराठा इंफट्री" चा "48 वा रेझिंग डे"मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी सर्व माजी सैनिक सहपरिवार उपस्थित होते.या कार्यक्रमाला स्नेह मेळाव्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच यावेळी देशभक्ती पर गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत कर्नल डॉ.सोमेश्वर गायकवाड यांच्यासह सुभेदार दत्तात्रय येणारे,सुभेदार महादेव कोतकर,कॅप्टन सखाराम शिंदे, सुभेदार मोहन दुसुंगे, सुभेदार मोहन शिंदे,सुभेदार बापू साठे, सुभेदार संदिप ठोकळ, सुभेदार मच्छिंद्र येवले,विलास शेळके, रोहिदास मापारी,कुंडलिक चेमटे बाबासाहेब निक्रड,वाल्मीक ओहोळ,दिलीप शेळके, विनायक जरे,दादाभाऊ जपकर,मंगेश गलगते,परमेश्वर कासार,संदीप कळमकर अशोक फुलसौंदर,संदीप शिर्के, अविनाश साठे,रंगनाथ मगर,भीमराव बनसोडे,अमोल ठुबे, रामदास ठुबे,संजय डोईफोडे, ज्ञानेश्वर नवथर,दत्ता धायगुडे, दीपक मुळे,संतोष करपे,राजेंद्र गांजुरे आदींसह माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुभेदार दत्तात्रय येणारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कर्तव्य पथावर असलेले सुभेदार संदीप ठोकळ व मच्छिंद्र येवले यांचा विशेष सत्कार करण्यात आला.महादेव कोतकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

आळंदी ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर्स डे साजरा

आळंदी : (स. गांवकरी)

आळंदी येथील आळंदी ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर्स डे निवृत्ती आरोग्य क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. उर्मिला शिंदे यांचा सत्कार करून सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली. विविध क्षेत्रातील सेवाभावी संस्था, पदाधिकारी यांनी डॉक्टर्स डे निमित्त आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. उर्मिला शिंदे यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना भेटून हार्दिक शुभेच्छा दिल्या. आळंदी ग्रामीण रुग्णालय मध्ये आरोग्य सेवेचा दर्जा त्यांनी वाढविला. रुग्ण संख्या मोठी असून देखील सर्व रुग्णांचे आरोग्य काळजी घेत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. गोरगरीब, शोषित पिढितांना योग्य उपचार त्यांनी पुरविले. आळंदी शहरातील तमाम झोपडपट्टी धारक, पथविक्रेता, आळंदी ग्रामस्थ यांना चांगली आरोग्य सेवा मिळावी यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. यांच्या सह त्यांच्या सर्व टीमला पुणे जिल्हाध्यक्ष संतोष सोनवणे यांनी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल, संलग्न पथारी सुरक्षा दल सह वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुणे जिल्हा महिला आघाडी कार्याध्यक्षा निलम सोनवणे, आळंदी नगरपरिषद सदस्य काजल धोंडगे, वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्हा सहसचिव धीरज कांबळे, वंचित बहुजन आघाडीचे खेड तालुका कार्याध्यक्षःदत्ता कांबळे आदी उपस्थित होते.

नेप्ती सोसायटीच्या प्रगतीत खुंटाळे यांचे योगदान - संजय जपकर

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर तालुक्यातील नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सचिव राजेंद्र खुंटाळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

अनेक वर्षे प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने व सभासदांच्या हिताला प्राधान्य देत केलेल्या उल्लेखनीय सेवेसाठी ग्रामस्थांनी कृतज्ञता व्यक्त केली. माजी सरपंच संजय जपकर, उपसरपंच एकनाथ जपकर आणि सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन खुंटाळे यांचा सन्मान करण्यात आला. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी दिली. सोसायटीची आर्थिक शिस्त, सभासदांचा विश्वास, कर्जवाटपातील पारदर्शकता आणि विकासाभिमुख निर्णय यामुळे नेप्ती सेवा सोसायटीला वेगळी ओळख मिळाली असून त्यामध्ये खुंटाळे यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. सचिव म्हणून काम करताना राजेंद्र खुंटाळे यांनी केवळ कार्यालयीन जबाबदाऱ्या पार पाडल्या नाहीत, तर सभासदांचा विश्वास जपत सेवा सोसायटीला सक्षम आणि विश्वासार्ह संस्था म्हणून उभी करण्याचे मोठे कार्य केले. त्यांच्या कामात प्रामाणिकपणा, शिस्त, संयम आणि पारदर्शकता या गुणांचे दर्शन नेहमीच घडले. त्यामुळेच सोसायटीच्या प्रत्येक निर्णयावर सभासदांनी विश्वास ठेवला. नेप्ती सेवा सोसायटीच्या प्रगतीत राजेंद्र खुटाळे यांचे मोठे योगदान आहे असे प्रतिपादन माजी सरपंच संजय जपकर यांनी केले.

ते पुढे म्हणाले, "आज खुंटाळे सेवानिवृत्त होत असले तरी त्यांनी निर्माण केलेली कार्यसंस्कृती आणि विकासाचा वारसा पुढील पिढीला प्रेरणा देणारा आहे. कोणतीही संस्था केवळ इमारतींमुळे मोठी होत नाही, तर त्यामागे निष्ठेने काम करणारी माणसे असतात. राजेंद्र खुंटाळे हे त्यापैकीच एक आहेत. त्यांच्या सेवेमुळे नेप्ती सेवा सोसायटीने प्रगतीची अनेक टप्पे गाठले असून त्यांचे योगदान ग्रामस्थ कधीही विसरणार नाहीत. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देतो."

सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "राजेंद्र खुंटाळे यांनी आपल्या सेवाकाळात सभासदांना आपलेपणाने मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक काम जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे पूर्ण केले. त्यांच्या कार्यामुळे सोसायटीची विश्वासार्हता अधिक वाढली. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचा अनुभव समाजाच्या विकासासाठी उपयोगी पडेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या."

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र खुंटाळे यांनी ग्रामस्थ, सभासद, संचालक मंडळ आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या सेवाकाळात सर्वांच्या विश्वासामुळेच जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडता आल्या, असे सांगत त्यांनी मिळालेला सन्मान हा आयुष्यभर जपून ठेवणारी अमूल्य आठवण असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे शाखा व्यवस्थापक गजेंद्र क्षीरसागर , माजी सरपंच संजय जपकर, उपसरपंच एकनाथ जपकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले , ग्रामसेवक प्रवीण पानसंबळ ,माजी उपसरपंच बाबासाहेब होळकर , दादू चौगुले, बंडू जपकर , चेअरमन सुरेंद्र होळकर, व्हाईस चेअरमन सादिक पवार, संचालक जालिंदर शिंदे, उमर सय्यद, अंबादास जपकर, राजेंद्र जपकर, सुरेश कदम, राजाराम जपकर, भाऊसाहेब होळकर, अशोक जपकर, मुक्ता कांडेकर, विलास जपकर, मच्छिंद्र होळकर, भास्कर जपकर, शांताबाई जपकर, जमीर सय्यद अमोल चौगुले माजी सचिव अशोक होळकर ,रामराव कांडेकर यांच्यासह ग्रामस्थ व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत भावनिक आणि उत्साहपूर्ण होते. उपस्थितांनी राजेंद्र खुंटाळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या कार्याचा आदर्श भावी पिढीने घ्यावा, अशी भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

नशा ही एका व्यक्तीबरोबरच कुटुंबाचा नाश करते

निमसे : डॉ.एन.जे.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे नशा मुक्त भारत जनजागृती रॅली संपन्न

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

आपला भारत हा तरुणांचा देश आहे. या तरुणांच्या हातात देशाचे भविष्य आहे. पण हाच तरुण वर्ग व्यसनाधीनता आजाराच्या विळख्यात सापडत आहे.नशा ही एका व्यक्तीबरोबरच संपूर्ण कुटुंबाचा नाश करते. तरुणांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी योग्य शिक्षण, समूपदेशनाची गरज असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. गणेश निमसे यांनी केले आहे.

वसंत टेकडी येथील डॉ.एन. जे.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने तथा समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशा मुक्त भारत' जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे,प्राचार्य डॉ.श्याम पंगा, प्राचार्य डॉ.अनुराधा चव्हाण, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करून निरोगी, सुदृढ व व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेश या रॅलीद्वारे देण्यात आला.

रॅलीचा शुभारंभ श्रीराम चौक येथून झाला. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीविषयी घोषणाबाजी करत तसेच जनजागृतीपर फलक हातात घेऊन नागरिकांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. श्रीराम चौक-पाईपलाईन रोड-डीमार्ट चौक या मार्गावरून रॅली काढण्यात आली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.पंकज आशिया (IAS), जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.मुम्मका सुदर्शन (IPS) तसेच समाज कल्याण विभागाचे अधिकारी श्री. देविदास कोकाटे साहेब यांनी कार्यक्रमास पूर्वपरवानगी देऊन शुभेच्छा दिल्या.

प्रा.निमसे पुढे म्हणाले विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून जनजागृतीचे कार्य सातत्याने करावे. कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. वेणू कोला, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ.प्रसाद घुगरकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय तारडे, प्रा.स्वाती कडनोर यांनी यावेळी रॅलीचे चोख नियोजन करून कार्यक्रमाच्या माध्यमातून "नशेला नकार,आरोग्याला होकार" हा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. व्यसनमुक्त, निरोगी व सशक्त भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

थोडक्यात पण महत्वाचे

दिव्यात पावसामुळे अनेक चाळीमध्ये साचणाऱ्या पाण्याला मिळाला मार्ग

नगरसेवक दीपक जाधव यांचा पुढाकार

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील प्रभाग २८ मधील विकास म्हात्रे गेट परिसरातील काळूबाई इमारतीतील रहिवाशांना गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असे रस्त्यावर गुडघाभर पाणी साचत असल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत होती. या गंभीर समस्येची दखल माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक दीपक जाधव यांनी संबंधित जागा मालकाशी चर्चा करून रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला. या चर्चेनंतर आवश्यक कार्यवाहीला सुरुवात करण्यात आली असून लवकरच या भागातील रहिवाशांना अनेक वर्षांपासून भेडसावत असलेल्या रस्त्याचा प्रश्न सुटणार असल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान दिवा परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे नाईक नगर, बेडेकर नगर आणि म्हात्रे गेट परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या परिस्थितीची माहिती मिळताच नगरसेवक दीपक जाधव यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधला. जेसीबीच्या साहाय्याने पाण्याचा नैसर्गिक प्रवाह मोकळा करून तुंबलेल्या पाण्याचा तात्काळ निचरा करण्यात आला. यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून स्थानिकांनी या तातडीच्या कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त केले. भविष्यात अशा समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. प्रसंगी उपविभाग प्रमुख तुकाराम मुंढे, उमेश घोगले, शाखाप्रमुख राम पवार, अमर पावले, उपशाखाप्रमुख अविनाश पाटील, शिवा मशाले, विनोद घाग प्रशांत बेडेकर, भट काका तसेच महापालिकेचे कानिष्ठ अभियंता आदित्य डावखर उपस्थित होते.

रेल्वे स्थानकात अतिरिक्त ६ लोकलला थांबा मिळावा - अँड. आदेश भगत

ठाणे (स. गांवकरी) : सकाळी गर्दीच्या वेळेस डोंबिवली आणि कल्याण स्थानकातून सुटणाऱ्या सहा जलद गाड्यांना दिवा स्थानकात अतिरिक्त थांबा द्यावा या मागणीसाठी दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष, नगरसेवक अँड. आदेश भगत यांनी मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांची भेट घेतली. दिवा रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची प्रचंड प्रमाणात गर्दी असल्याने मध्य रेल्वे मार्गावर प्रवाशांची संख्या वाढण्याची सरासरी लक्षात घेतली तर यामध्ये दिवा स्थानकाचा पहिला क्रमांक लागतो. सकाळी गर्दीच्या वेळेत दिवा स्थानकात जलद लोकल थांबत असल्या तरी त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. सकाळी गर्दीच्या वेळेस ज्या काही जलद गाडयांना दिवा स्थानकात थांबा दिला आहे त्यापैकी बऱ्याचशा लोकल अंबरनाथ, बदलापूर, आसनगाव, कर्जत, कसारा, खोपोली, अंबरनाथ, टिटवाळा या स्थानकातून सुटतात. परिणामी, त्या सर्वच लोकल प्रवाशांनी गच्च भरून येतात. त्यामुळे दिव्यातील प्रवाशांना लोकलमध्ये चढता सुध्दा येत नाही. सकाळी गर्दीच्या वेळेस डोंबिवली आणि कल्याण स्थानकातून सुटणाऱ्या खालील जलद गाडयांना दिवा स्थानकात थांबा देण्याची मागणी अँड आदेश भगत यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. दिवा रेल्वे स्थानकात १५ डब्यांच्या लोकल उभ्या राहतील इतकी फलाटांची लांबी वाढविण्याचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. त्यामुळे वर मागणी केलेल्या जलद गाडयांना दिवा स्थानकात थांबा देणे सहज शक्य असल्याचे मत अँड.आदेश भगत यांनी व्यक्त केले. दिवेकर रेल्वे प्रवाशांची होणारी गैरसोय व गर्दीमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी मागणी तत्काळ पूर्ण करावी अशी विनंती दिवा रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने नगरसेवक अँड. आदेश भगत यांनी केली आहे.

मतदारसंघात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू

शिर्डी (स. गांवकरी) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २१८ शिर्डी विधानसभा मतदारसंघासह राज्यभरात 'मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम -२०२६' राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांना गणना प्रपत्र (एन्युमरेशन फॉर्म-ईएफ) वितरित करीत आहेत. मतदारांनी हे प्रपत्र अचूक भरून संबंधित बीएलओकडे सादर न केल्यास त्यांचे नाव आगामी प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, असे आवाहन शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी केले आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेले गणना प्रपत्र अचूक भरून देणे प्रत्येक मतदारासाठी आवश्यक आहे. कुटुंबातील कोणतीही एक सज्ञान व्यक्ती स्वतःच्या तसेच कुटुंबातील इतर सदस्यांच्या वतीने हे प्रपत्र भरून त्यावर स्वाक्षरी करू शकते. प्रत्येक मतदाराने प्रपत्रावर लावण्यासाठी एक पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो तयार ठेवावा. ज्या मतदारांचे गणना प्रपत्र प्राप्त होणार नाही किंवा भरलेले प्रपत्र सादर केले जाणार नाही, अशा मतदारांची नावे ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात येणार आहेत. ज्या मतदारांची २००२ च्या मतदार यादीशी अद्याप जुळवणी (मॅपिंग) झालेली नाही, त्यांनी आपल्या कुटुंबातील सज्ञान सदस्यांची किंवा आई, वडील, आजी अथवा आजोबा यांची आवश्यक माहिती संबंधित बीएलओकडे उपलब्ध करून द्यावी. योग्य जुळवणी झाल्यास पुढील सुनावणीची नोटीस मिळण्याची आवश्यकता टाळता येईल. मतदार यादीतील माहिती अद्ययावत करण्यासाठी आणि त्रुटी दूर करण्यासाठी मतदारांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. १ जुलै १९८७ पूर्वी जन्मलेल्या व्यक्तींनी स्वतःचा जन्मदिनांक किंवा जन्मस्थळ सिद्ध करणारा कोणताही एक विहित पुरावा सादर करावा.

वारस नोटीस

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

क्र.कावि/फौजदारी / वारस दाखला/११/२०२६ अकोले दि. १८/०५/२०२६

श्रीम.सुधा संपत करवंदे, रा.धामणवन, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांचे पती कै. संपत भिवा करवंदे दि. २०/०३/२०२६ रोजी एसएमबीटी हॉस्पिटल धामणगाव, ता. इगतपुरी येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे आदर्श विद्यामंदिर देवधे ता.लांजा जि. रत्नागिरी या ठिकाणी सहा.शिक्षक या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

अक्र.	वारसाचे नाव	वय वर्ष	नाते
१	सुधा संपत करवंदे	२६	पत्नी
२	रुद्र संपत करवंदे	०३	मुलगा
३	अनुसयाबाई भिवा करवंदे	६१	आई

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.

तहसिलदार, अकोले

सोलापूर जिल्ह्याचे झाले दोन तुकडे; पंढरपूर अप्पर जिल्हा

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्ह्याच्या प्रशासकीय पुनर्रचनेच्या दिशेने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल पडले आहे. पंढरपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याच्या प्रस्तावाला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे जी प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली होती, ती आता पुन्हा तातडीने सुरू करण्याचे आदेश महसूल व वनविभागाने दिले आहेत. १५ दिवसांत हरकती व सूचना नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे शासनाच्या नवीन निर्देशानुसार, आजपासून १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रस्तावित कार्यालयाबाबत नागरिकांना आपल्या हरकती आणि सूचना मांडण्याची संधी दिली असून, संबंधित अधिकाऱ्यांनी यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, पंढरपूर येथील अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात खालील सात महत्त्वाच्या तालुक्यांचा समावेश केला जाणार आहे: यामध्ये पंढरपूर, माळशिरस, माढा, करमाळा, सांगोला, मोहोळ, मंगळवेढा या तालुक्यांचा समावेश आहे. या सातही तालुक्यांतील नागरिकांना आता छोट्या-मोठ्या प्रशासकीय कामांसाठी थेट सोलापूर जिल्हा मुख्यालय गाठण्याची गरज पडणार नाही. पंढरपूर येथेच हे कार्यालय सुरू झाल्याने वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठी बचत होणार असून, प्रशासकीय कामांना वेग येणार आहे. सोलापूर ग्रामीण भागातील जनतेचे हक्काचे प्रशासकीय केंद्र आता पंढरपुरात आकारास येत आहे.

अण्णा हजारेंच्या मागण्यांची दखल ; माहिती अधिकार कायद्यातील बदलांना स्थगिती

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्य माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या अत्यंत वादग्रस्त बदलांना अखेर राज्य सरकारने तूर्तास स्थगिती दिली आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी या बदलांविरोधात पुकारलेल्या आंदोलनाची आणि मागण्यांची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट पुढाकार घेतला.

मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला पाठवलेल्या पत्राची दखल घेत, मुख्य माहिती आयुक्तांनी हे बदल स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे माहिती अधिकार क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि अण्णा हजारे यांच्या लढ्याला मोठे यश आले आहे.

अण्णा हजारे उपोषणावर ठाम राहिल्याने अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या विषयात मध्यस्थी केली. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला थेट एक पत्र पाठवले. या पत्रामध्ये त्यांनी स्पष्ट नमूद केले की, "ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्याशी या संदर्भात सविस्तर चर्चा केल्याशिवाय माहिती अधिकार कायद्यात कोणताही बदल किंवा निर्णय घेणे उचित ठरणार नाही." मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या महत्त्वाच्या विनंतीनंतर आणि त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे राज्य मुख्य माहिती आयोगाने १२ जून रोजी राजपत्रात प्रकाशित केलेल्या सर्व बदलांना स्थगिती दिली आहे. दरम्यान, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देखील फडणवीस सरकारला उपोषणाचा इशारा दिला होता. शासनाने १२ जून रोजी माहिती अधिकार कायदा २००५ संदर्भात सुधारित अधिसूचना जारी केली आहे. मात्र, त्यास सामाजिक संघटनांनी विरोध दर्शवला आहे. या कायद्यानुसार आतापर्यंत माहिती अधिकार कायद्याचा वापर करून माहिती मागवताना होणारा १० रुपयाचा खर्च होता, मात्र आता तो खर्च ३० रुपयांवर गेला आहे. यासोबतच प्रथम अपील ५० रुपये तर दुसऱ्या अपिलासाठी शंभर रुपये शासनाकडे जमा करावे लागणार आहेत. मिळालेल्या माहितीसाठी प्रतिपान दोन रुपयावरून प्रतिपान पाच रुपये इतकं शुल्क संबंधित विभागाकडून आकारला जाणार आहे. या नियमासह एकूण १२ नियम करण्यात आले आहेत. या नियमांमुळे सामान्य नागरिकांना माहिती मिळवणं अशक्य होणार आहे. माहिती अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, पैसे कमावण्याचं साधन नाही. काही लोक याचा गैरफायदा घेतात, त्यामुळे शुल्क आकारणं गरजेचे आहे. मात्र, यातून पैसे कमावणे हा उद्देश नसावा असं अण्णांनी म्हटलं होतं. फडणवीस सरकारने केलेले बदल पुन्हा पूर्ववत केले नाही, तर आपण उपोषण करणार असल्याचं देखील अण्णा हजारे यांनी म्हटलं होतं.

सोलापूर जिल्ह्यात निधीअभावी 'ग्राम सुरक्षा यंत्रणा' पडली बंद

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्ह्यात निधीअभावी 'ग्राम सुरक्षा यंत्रणा' बंद पडली आहे ; यामुळे ११.७१ लाख ग्रामस्थांच्या सुरक्षेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे ! निधीअभावी ही ग्राम सुरक्षा यंत्रणा ठप्प झाली आहे. या ग्राम सुरक्षा यंत्रणेमधून १,०३० ग्रामपंचायतींतील ११.७१ लाख ग्रामीण नागरिक यांना तात्काळ मदत मिळाली होती, आपत्कालीन सूचना व समन्वयाविना असुरक्षिततेच्या छायेत हि योजना बंद करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ सूचना, मदत आणि समन्वय उपलब्ध करून देणारी 'ग्राम सुरक्षा यंत्रणा' आर्थिक अडचणींमुळे ग्रामपंचायतींकडून नियमित निधीची तरतूद व देयकांची पूर्तता होत नसल्याने ही अत्यंत उपयुक्त सेवा आज ता. 30 जुनपासून बंद करण्याचा निर्णय घेण्याची वेळ यंत्रणा व्यवस्थापनावर आली आहे.'बहुदा जगातील सर्वोत्तम आपत्कालीन संपर्क यंत्रणा ' हे ब्रीद घेऊन काम करणारी यंत्रणा बंद झाल्याने येत्या संकटकाळात मदत कशी होईल याची काळजी मात्र नागरिकांना लागली आहे.

योजना सुरक्षित असूनही निधीअभावी असुरक्षित बनली आहे. २०२१ मध्ये यंत्रणा सुरू झाल्यानंतर प्रत्येक गावात दहा घटना घडेपर्यंत कोणताही निधी न स्वीकारता सर्व गावांना मोफत सेवा पुरविण्यात आली होती. या उपक्रमाचे महत्त्व आणि परिणामकारकता ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतरच प्रति कुटुंब वार्षिक केवळ ५० रुपये या अत्यल्प दराने निधी स्वीकारण्यास सुरुवात करण्यात आली. तसेच कोरोना काळात निधी न भरलेल्या गावांनाही सलग दोन वर्षे अखंडित सेवा देण्यात आली होती. मात्र, अनेक ग्रामपंचायतींकडून निधीची तरतूद न होणे आणि नियमित देयके न अदा केल्याने यंत्रणेच्या देखभाल व संचालनासाठी आवश्यक आर्थिक संसाधनांचा तुटवडा निर्माण झाला आहे. परिणामी सेवा चालू ठेवणे कठीण बनले असून, ती बंद करण्याचा निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

ग्राम सुरक्षा यंत्रणा बंद झाल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना चोरी, दरोडे, अपहरण यांसारख्या गुन्हेगारी घटनांमध्ये तात्काळ मदत मिळण्याची सुविधा बंद होईल. आग व जळीत दुर्घटनांमध्ये वेळेत माहिती आणि मदत न मिळाल्याने जीवित व मालमत्तेचे नुकसान वाढू शकते. शासकीय योजना, आदेश व महत्त्वाच्या सूचना नागरिकांपर्यंत वेगाने पोहोचविण्याची प्रभावी यंत्रणाही निष्क्रिय होईल. तसेच पूर किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात वेळेत इशारे व मदत न मिळाल्यास मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तीय हानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सप्टेंबर २०२१ मध्ये सुरू करण्यात आलेली ग्राम सुरक्षा यंत्रणा आज सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील तब्बल १,०३० ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत आहे. या यंत्रणेत ११ लाख ७१ हजारांहून अधिक ग्रामस्थ सहभागी असून, नागरिक व प्रशासनाने टोलफ्री क्रमांक १८०० २७० ३६०० चा २१ हजार ६६३ पेक्षा अधिक वेळा लाभ घेतला आहे.

सोलापूर महापालिकेच्या सभापतींची बिनविरोध निवड

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विषय समित्यांच्या सभापतीपदी आज बिनविरोध निवड करण्यात आली. नव्याने निवड झालेल्या सभापतींवर विविध विभागांच्या कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी निर्मला जंगम, स्थापत्य समितीच्या सभापतीपदी विजय चिप्पा, आरोग्य समितीच्या सभापतीपदी सुनील खटके, कामगार व कल्याण समितीच्या सभापतीपदी श्रद्धा किरण पवार, विधी समितीच्या सभापतीपदी सत्यजित वाघमोडे, मंडई व उद्यान समितीच्या सभापतीपदी मल्लिकार्जुन पाटील, तर शहर सुधारणा समितीच्या सभापतीपदी स्वाती बडगु यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर महापालिका परिसरात नवनिर्वाचित सभापतींचे सहकारी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले. यावेळी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

शहराच्या विकासाला गती देणे, नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आणि समितीअंतर्गत प्रलंबित प्रश्नांना प्राधान्याने मार्गी लावण्याचा निर्धार नवनिर्वाचित सभापतींनी व्यक्त केला. महापालिकेतील या निवडीमुळे विविध विषय समित्यांचे कामकाज अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अध्यक्षपदी डॉ. निलेश पगार, तर सेक्रेटरी पदी डॉ. भगवान टोम्पे

आरोग्य क्षेत्राला सक्षम नेतृत्वाची नवी दिशा; वैद्यकीय सेवेची गुणवत्ता उंचावण्याची अपेक्षा

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी घडामोड, कळवण तालुका मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी वक्रतुंड हॉस्पिटलचे संचालक डॉ. निलेश वसंत पगार यांची, तर सेक्रेटरी पदीं छत्रपती हॉस्पिटलचे संचालक डॉ. भगवान टोम्पे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. भगवान टोम्पे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे आणि रुग्णांशी असलेल्या आत्मीय नात्यामुळे त्यांनी समाजात विश्वासार्ह स्थान निर्माण केले आहे छत्रपती हॉस्पिटल कळवण .

त्याचप्रमाणे डॉ.निलेश वसंत पगार यांनीही वैद्यकीय सेवेसोबत सामाजिक बांधिलकी जपत अनेक आरोग्यविषयक उपक्रम राबविले असून त्यांच्या संघटन कौशल्याचा मेडिकल असोसिएशनला निश्चितच लाभ होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे वक्रतुंड हॉस्पिटल कळवण.

तालुक्यातील डॉक्टरांमध्ये समन्वय वाढविणे, आधुनिक वैद्यकीय ज्ञानाची देवाणघेवाण, ग्रामीण भागात आरोग्य जनजागृती, गरजू रुग्णांसाठी आरोग्य शिबिरे, आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे तसेच वैद्यकीय व्यवसायातील नैतिक मूल्ये अधिक बळकट करण्यासाठी ही नवी कार्यकारिणी प्रभावी भूमिका बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या निवडीबद्दल सोशल मीडियावरही अभिनंदनाचा वर्षाव सुरू असून अनेक डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी शुभेच्छा देत त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी विश्वास व्यक्त केला आहे.

आरोग्य हीच खरी समाजाची संपत्ती आहे. अशा परिस्थितीत अनुभवी, सेवाभावी आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व मेडिकल असोसिएशनला लाभणे ही कळवण तालुक्यासाठी सकारात्मक बाब मानली जात आहे. डॉक्टरांमधील एकी, रुग्णकेंद्रित सेवा आणि आरोग्य व्यवस्थेतील समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी ही निवड महत्त्वपूर्ण ठरेल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

भिवंडी तालुका तलाठी संघाचे मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील ग्रामीण महसूल विभागाचे कामकाज अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या उद्देशाने भिवंडी तालुका तलाठी संघटनेच्या वतीने ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्यासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. महसूल विभागातील बदलत्या कार्यपद्धती, शासनाच्या नव्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, डिजिटल प्रणालीचा वाढता वापर आणि नागरिकांना अधिक दर्जेदार व पारदर्शक सेवा देण्याच्या दृष्टीने हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले.

भिवंडी तालुका तलाठी संघटनेच्या शाखेच्या वतीने आयोजित या शिबिरात महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे माजी सरचिटणीस अशोक दुधसागरे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून "संघटनेचे महत्त्व आणि ग्राम महसूल अधिकारी पदाचे कर्तव्य" या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी तलाठी हे शासन आणि नागरिक यांच्यातील महत्त्वाचे दुवा असून, बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून महसुली कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी त्यांनी महसूल विभागातील बदलते स्वरूप, प्रशासनातील कार्यक्षमता, शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, डिजिटल महसूल व्यवस्थापन, नागरिकाभिमुख सेवा आणि कामकाजातील पारदर्शकता यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच तलाठ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत नागरिकांना जलद, अचूक आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

शिबिरादरम्यान उपस्थित तलाठ्यांनी महसुली कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अनेक व्यावहारिक शंकांचे निरसन करण्यात आले. बदलत्या प्रशासकीय पद्धती, ऑनलाइन सेवा, डिजिटल नोंदी, तसेच भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

मुरबाड : मुरबाड विधानसभा मतदारसंघात असलेल्या कल्याण तालुक्याची लवकरात लवकर आमसभा घ्यावी यासाठी कल्याण तालुक्याचे गट विकास अधिकारी यांना नुकतच सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनी निवेदन दिले आहे. या निवेदनाच्या माध्यमातून त्यांनी कल्याण पंचायत समितीमध्ये दिव्यांग बांधवांसाठी दिव्यांग कक्ष सुद्धा उभारावा अशी मागणी केली आहे. शेती, वीज, पाणी, तालुक्यातले रस्ते, अंतर्गत रस्ते आणि अनेक विषयांवरचे प्रश्न सध्या प्रलंबित आहे. त्यामुळे प्रशासनाकडून जनतेला न्याय मिळत नाही. गेले अनेक वर्ष कल्याण तालुक्याची आमसभा झाली नाही. सदर आमसभा गटविकास अधिकारी यांनी लवकरात लवकर होण्यासाठी कार्यवाही करावी ही मागणी भरत दळवी यांनी केली आहे.

थोडक्यात बातम्या...

घोडेगाव-मंचर-बेल्हे रस्त्याच्या विकासासाठी निधी मंजूर

आळेफाटा (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव-मंचर-बेल्हे (रा. मा. क्र. १११) या महत्त्वाच्या रस्त्याच्या विकासासाठी आशियाई विकास बँकेच्या साहाय्याने सुमारे ४७० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामामुळे रस्ता अधिक रुंद, सुरक्षित आणि गतिमान होणार असून, पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यांतील दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे, अशी माहिती माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली. घोडेगाव-मंचर-बेल्हे या रस्त्याच्या कामाचा सर्वाधिक लाभ श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे येणाऱ्या मराठवाड्यातील भाविकांना होणार आहे. सध्या मराठवाड्यातील प्रवाशांना अहिल्यानगर-बेल्हे-आळेफाटा-नारायणगाव-मंचरमार्गे भीमाशंकर येथे जावे लागते. मात्र, घोडेगाव-मंचर-बेल्हे रस्ता विकसित झाल्यानंतर अहिल्यानगर-बेल्हे-मंचर-घोडेगावमार्गे भीमाशंकरकडे जाणारा मार्ग अधिक जवळचा ठरणार आहे. त्यामुळे सुमारे २० किलोमीटर अंतर कमी होऊन २० ते २५ मिनिटांचा प्रवास वाचणार आहे, तसेच इंधनाची बचत होऊन भाविक, व्यापारी आणि स्थानिक नागरिकांना मोठा फायदा होणार असल्याची माहिती माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

विक्रमदादा पाचपुते यांच्या वाढदिवसा निमित्त ढवळगाव येथे वृक्षारोपण

श्रीगोंदा तालुका (स.गांवकरी) : श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमदादा बबनरावजी पाचपुते यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार (दि. २ जुलै २०२६) रोजी जिल्हा परिषद मराठी शाळा, ढवळगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. "एक वृक्ष लावूया... हरित भविष्य घडवूया!" हा संदेश देत उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला. यावेळी माजी सरपंच रवींद्र शिंदे, माजी उपसरपंच अजय वाळुंज, पाणी वापर संस्था समितीचे सदस्य पांडुरंग ढवळे, माजी ग्रामपंचायत सदस्य अमोल बोरगे, जिल्हा परिषद मराठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारीवृंद तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी आमदार विक्रमदादा पाचपुते यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांना निरोगी, दीर्घायुषी जीवन आणि पुढील जनसेवेसाठी यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

शेतकऱ्यांनी रेशीम उद्योग कडे लक्ष द्यायला पाहिजे : केसलकर

राजगुरुनगर (स. गांवकरी) : हवामानातील बदल, नैसर्गिक आपत्ती आणि शेतीमालाच्या बाजारभावातील सातत्याने होणाऱ्या चढ-उतारामुळे शेती व्यवसाय अधिक जोखमीचा बनत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीला शाश्वत उत्पन्नाचा आधार मिळावा यासाठी इतर जोड व्यवसायांसह रेशीम उद्योगाकडेही वळण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रेशीम संचालनालय, पुणे येथील केसलकर यांनी केले. शेतकऱ्याच्या हितासाठी शेती क्षेत्रात आमूलाग्र बदल करणारे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने पंचायत समितीच्या राजा शिवछत्रपती सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कृषी दिन कार्यक्रमानिमित्त तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजगुरुनगर येथे कृषी दिन साजरा करण्यात आला.

भारताच्या सीमेवरील सैनिकाची ओळख म्हणजे शस्त्र आणि युद्ध

भक्ती व शक्तीचा संगमच खरी देशसेवा – ह.भ.प. दत्तात्रय महाराज लाटे

- २४ वर्षांच्या गौरवशाली सेवेनंतर मेजर (हवालदार) वसंत कुरुमकर यांचा वांगदरी येथे नागरी सत्कार

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

"भारतीय सैनिकांची ओळख शस्त्र आणि युद्ध हीच आहे. सीमेवर सैनिक सज्ज असल्यामुळेच देशातील नागरिक सुरक्षित आहेत. भक्ती आणि शक्ती यांचा संगमच खरी देशसेवा आहे," असे प्रतिपादन ह.भ.प. दत्तात्रय महाराज लाटे यांनी केले.

श्रीगोंदा तालुक्यातील वांगदरी येथील सुपुत्र वसंत विठ्ठलराव कुरुमकर यांनी भारतीय सैन्याच्या कॉर्प्स ऑफ सिग्नल्समध्ये हवालदार पदावर तब्बल 24 वर्षे गौरवशाली सेवा बजावून नुकतीच सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यानिमित्त गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा व त्यांच्या पत्नीचा नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठलराव नागवडे होते. यावेळी आयोजित प्रवचनात ह.भ.प. दत्तात्रय महाराज लाटे म्हणाले की, देशाप्रती प्रेम, बांधिलकी आणि त्यागाची भावना प्रत्येक भारतीयामध्ये असली पाहिजे. "राष्ट्र माझे, देश माझा" ही भावना ज्यांच्या मनात नाही, ती विकृती आहे. भारतमातेच्या रक्षणासाठी बलिदान देणारे सैनिकच खऱ्या अर्थाने अमर असतात. एका दाण्याचे बीज मातीत रुजल्यावर अनेक दाणे निर्माण होतात, त्याचप्रमाणे सैनिकांचे त्याग आणि बलिदान राष्ट्राला सामर्थ्य देणारे असते, असे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना मेजर (हवालदार) वसंत कुरुमकर भावूक झाले. त्यांनी सांगितले की, वडिलांच्या निधनानंतर आईने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा सांभाळ केला. देशसेवेच्या काळात आई, पत्नी, भाऊ आणि संपूर्ण कुटुंबाचे मोठे पाठबळ लाभल्यामुळेच यशस्वी कारकीर्द घडली.

कुरुमकर यांनी 31 डिसेंबर 2002 रोजी सैन्य सेवेत प्रवेश केला. गोवा, जबलपूर, बरेली, जम्मू-काश्मीर, नवी दिल्ली, कारगिल, शिलाँग, सिकंदराबाद, तेजपूर (आसाम) आदी ठिकाणी त्यांनी सेवा बजावली. 30 जून 2026 रोजी जबलपूर येथे त्यांच्या सेवाकाळाचा समारोप झाला. यावेळी त्यांनी सैन्यातील अनेक थरारक अनुभवही उपस्थितांशी शेअर केले.

कार्यक्रमात नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनीही शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विठ्ठलराव नागवडे, प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आबासाहेब जगताप, सेवा संस्थेचे चेअरमन राजेंद्र निळकंठ नागवडे, सरपंच तुषार नागवडे, माजी सरपंच संजय नागवडे, भाजप तालुकाध्यक्ष संदीप नागवडे, रामचंद्र नागवडे, पोलीस पाटील सुभाष गोरे, अरविंद हराळ, साहेबराव महानवर, मेजर राजेंद्र ठोकळ आदींनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी माजी सैनिक चोरमले, मेजर श्रीरंग नागवडे, मेजर कदम, बाळासाहेब नागवडे, सदाशिव मोहिते, भगत मेजर, मलभारे मेजर, दाते मेजर, निंबाळकर मेजर, पत्रकार नंदकुमार कुरुमकर तसेच ग्रामपंचायत, सेवा संस्थेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापूराव कांबळे यांनी केले, तर हनुमंत कुरुमकर यांनी आभार मानले.

किरण कानडे यांचा सन्मान

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

राजगुरुनगर येथील कृषी सहाय्यक अधिकारी किरण कानडे यांचा कृषी दिनी सन्मान पत्र देऊन गौरव करण्यात आले. किरण कानडे यांचे खेड तालुक्याच्या कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान असून त्यांनी शेती क्षेत्रात आधुनिकतेची कास धरत शेतकरी बांधवांना बीबीएफ (Broad Base Furrow) या तंत्रज्ञानाचा अत्यंत प्रभावी, सुटसुटीत व उत्कृष्ट पद्धतीने प्रचार आणि प्रसार केला. आपल्या या अथक प्रयत्नांमुळे आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धतीचा अंगीकार करण्याचे बळ व मोलाचे प्रोत्साहन मिळाले. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीने कृषी क्रांतीला गती देणारे ठरले आहे.त्यामुळे समर्पित लोकभावनेचा सार्थ गौरव म्हणून कृषी दिन निमित्त किरण कानडे यांना पंचायत समितीचे उपसभापती मंगेश सावंत यांचे हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सभापती विद्याताई मोहिते, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील भोईर,तालुका कृषी अधिकारी वैभव विश्वे,पंचायत समिती सदस्य दिलीप डुबे,रूपाली कांबळे,कविता राक्षे, डॉ.प्रशांत शेटे, , कांदा लसूण केंद्राचे शैलेंद्र घाडगे,पर्यावरण रक्षक फाउंडेशनचे रणजीत घोळवे,कृषी अधिकारी विजय खेडेकर, रेशीम संचनालय पुणे येथील केसलकर साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

मातृप्रेमासह पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील बी. बी. पाटील विद्यालय, कुंरुंद येथे 'एक झाड आईच्या नावाने' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाबरोबरच आईप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत सुमारे १५० विविध प्रजातींच्या रोपांची शाळेच्या परिसरात लागवड केली . या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक रोप लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होण्याबरोबरच मातृप्रेम, कृतज्ञता आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली.

कार्यक्रमादरम्यान विविध प्रकारच्या फळझाडे, फुलझाडे आणि सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "आईने आपल्याला जन्म दिला, संस्कार केले आणि आयुष्य घडवले. तिच्याप्रती खरी कृतज्ञता व्यक्त करायची असेल, तर तिच्या नावाने एक वृक्ष लावून त्याचे जतन व संवर्धन करणे हीच सर्वात मोठी आदरांजली आहे." त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेल्या रोपाची नियमित काळजी घेऊन ते मोठे करण्याचे आवाहन केले. लावलेल्या सर्व रोपांचे नियमित संगोपन व्हावे यासाठी शाळेच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले असून, ठिबक सिंचन व्यवस्था उभारण्यात आली आहे. त्यामुळे रोपांना वर्षभर आवश्यक पाणी उपलब्ध होऊन त्यांची योग्य वाढ होण्यास मदत होणार आहे. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होत असल्याचे मत व्यक्त केले.

सहकार सप्ताहानिमित्त वृक्षलागवडीने पर्यावरण रक्षणाचा संदेश

वडगाव आनंद : (स. गांवकरी)

सहकार सप्ताहाचे औचित्य साधून आळेफाटा येथील गोमाता दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या वतीने वडगाव आनंद येथील कळमजाई मंदिर परिसरात बुधवारी भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. 'सहकारातून समृद्धी आणि वृक्षलागवडीतून पर्यावरण रक्षण' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत हिरवेगार नंदनवन फुलवण्याच्या उद्देशाने कडुनिंब, वड, पिंपळ, चिंच, गुलमोहर, करंज यांसारख्या बहुगुणी देशी वृक्षांसह विविध शोभिवंत फुलझाडांची लागवड करण्यात आली. ग्रामीण भागातील सहकार चळवळीबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी समाजाने स्वीकारावी, या उद्देशाने हा

उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष गणेश वाघमारे, उपाध्यक्ष गणेश रामचंद्र देवकर, सचिव अभिषेक कोकाटे यांच्यासह संचालक मंडळ, आळेफाटा व वडगाव आनंद परिसरातील दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच वडगाव आनंदचे उपसरपंच गणेश भुजबळ, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ गढे, वैशाली देवकर, ऋषिकेश गढे, महेंद्र भुजबळ, कमलेश मोरे, कळमजाई देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी आणि तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी श्रमदान करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिकमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष गणेश मारुती वाघमारे म्हणाले, "दुग्ध व्यवसायामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळत असले तरी निसर्गाचा समतोल बिघडल्यास शेती आणि पशुपालनावर त्याचा थेट परिणाम होतो. वाढते तापमान आणि पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. आम्ही केवळ झाडे लावली नसून ती जगवण्याचाही संकल्प केला आहे."

संस्थेचे सचिव अभिषेक कोकाटे यांनी सांगितले की, वृक्षारोपणाबरोबरच झाडांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक झाडाला नियमित पाणी, खत तसेच जनावरांपासून संरक्षणासाठी ट्री-गार्डची व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेने स्वीकारली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

गोड्या पाण्यातील खेकडे पकडण्याची परंपरा पुन्हा जिवंत

आरोग्यासाठी पोषक मानले जाणारे खेकडे

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)

डांग जिल्हा आपल्या हिरवाईने नटलेल्या दाट जंगलांमुळे, नद्या, धबधबे आणि समृद्ध जैवविविधतेमुळे संपूर्ण गुजरातमध्ये वेगळी ओळख निर्माण करतो. या जैवविविधतेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे गोड्या पाण्यात आढळणारे खेकडे. डांगमधील आदिवासी समाजात त्यांना सामान्यतः "खेकडे" म्हटले जाते, तर गामीत भाषेत त्यांना "कुआली" असे संबोधले जाते. इंग्रजीमध्ये त्यांना Freshwater Crab असे म्हणतात.

डांग पर्यावरण संशोधन केंद्र (DNRC)चे अमितभाई राणा यांनी सांगितले की, पावसाळ्याची सुरुवात होताच डांगमधील आदिवासी पारंपरिक पद्धतीने खेकडे पकडण्यास सुरुवात करतात.

सध्या डांग जिल्ह्यात आढळणाऱ्या विविध खेकड्यांच्या प्रजातींचे दस्तऐवजीकरणही केले जात आहे. त्यांच्या मते, डांगी आदिवासी खेकड्यांना देवतुल्य मानतात. त्यांच्या पारंपरिक आहारातही खेकड्यांचा समावेश असून, खेकड्याचे सूप आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक मानले जाते.

डांग जिल्ह्यात प्रामुख्याने काळे, पांढरे आणि लाल (केशरी) रंगाचे खेकडे आढळतात. प्रत्येक

प्रकारची वैशिष्ट्ये वेगळी आहेत. काळे खेकडे प्रामुख्याने रात्री सक्रिय असतात, तर पांढरे आणि केशरी खेकडे दिवसा अधिक प्रमाणात दिसून येतात.

अमितभाई राणा यांच्या माहितीनुसार, हिवाळ्यात खेकड्यांची संख्या तुलनेने जास्त असते. मात्र पावसाळ्यात त्यांची पिल्ले लहान असल्यामुळे बहुतेक खेकडे आपल्या बिळात किंवा सुरक्षित ठिकाणी राहणे पसंत करतात.हे खेकडे सामान्यतः नद्या, ओढे आणि झऱ्यांच्या काठावरील दगडाखाली किंवा जमिनीत तयार केलेल्या बिळांमध्ये राहतात. मात्र ते नदीच्या अतिशय खोल भागात जात नाहीत. काळ्या खेकड्यांची संख्या कमी असल्याने बाजारात त्यांना मोठी मागणी असते. स्थानिक बाजारात त्यांची किंमत सुमारे ३०० ते ४०० रुपये प्रति किलोपर्यंत असते. पांढरे खेकडे तुलनेने अधिक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्यांची किंमत कमी असते.डांगी आदिवासी पिढ्यानपिढ्या पारंपरिक पद्धतीने खेकडे पकडतात. ते नद्या आणि झऱ्यांमध्ये जाळी लावतात तसेच बांबूपासून तयार केलेल्या "कटवा" नावाच्या विशेष साधनाचा वापर करतात. या साधनामध्ये माशांची हाडे, कोंबडीचे आतडे आणि इतर खाद्य अवशेष ठेवून ते रात्री पाण्यात बुडवून ठेवले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यामध्ये अडकलेले खेकडे बाहेर काढले जातात. अनेक आदिवासी कुटुंबांमध्ये खेकडे हा पारंपरिक आहाराचा भाग आहे. पावसाळा आणि हिवाळ्यात खेकड्यांपासून बनवले जाणारे विविध पदार्थ स्थानिक संस्कृती आणि जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग मानले जातात.डांगमधील खेकडे हे केवळ एक जलचर प्राणी नसून, ते या प्रदेशाच्या निसर्ग, परंपरा, आदिवासी ज्ञान आणि जीवनपद्धतीशी जोडलेला एक जिवंत वारसा आहेत. या पारंपरिक ज्ञानाचे आणि नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, जेणेकरून भावी पिढ्यांनाही डांगची ही अनोखी जैवविविधता आणि सांस्कृतिक परंपरा जवळून अनुभवता येईल.

थोडक्यात पण महत्वाचे

दिलीप धनगर यांची मुरबाड तालुका शाखा अध्यक्षपदी निवड

मुरबाड (स. गांवकरी) : भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय अध्यक्ष राजरत्न अशोकराव आंबेडकर यांच्या आदेशाने नुकतच मुरबाड तालुक्याची भारतीय बौद्ध महासभा नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आले आहे. दिलीप तातू धनगर अध्यक्ष, किसन रातांबे महासचिव, जयदीप आढाइंगे कोषाध्यक्ष, लक्ष्मण खोळंबे , महेंद्र धनगर उपाध्यक्ष, विश्वास खंडागळे सहसचिव, राजेश चंदने सचिव, लक्ष्मण नागवंशी सहकोषाध्यक्ष, विलास साळवे मुख्य संघटक, सागर खोळंबे सहसंघटक, काशिनाथ अहिरे संस्कार समन्वयक, मनोहर भोईर सहविहार समन्वयक, ॲडव्होकेट मदन थोरात, वसंत वामन थोरात, दीपक धनगर, सागर जाधव संघटक,आरती जाधव महिला उपाध्यक्षा,दीपा दिलीप धनगर महिला संघटिका, जगदीश जाधव सहसंस्कार समन्वयक ,आशा सोनावणे महिला सहसंघटक,सुरेश भालेराव विहार समन्वयक,मिलिंद भवार मीडिया समन्वयक,भगवान घायवट संघटक या सर्वांची नुकतच बिनविरोध निवड करण्यात आली आहे .हा निवडीचा कार्यक्रम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती सभागृह मुरबाड या ठिकाणी संपन्न झाला. या निवड प्रक्रियेच्या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य व ठाणे जिल्हा शाखेचे अनेक पदाधिकारी, तसेच पत्रकार आणि मान्यवर उपस्थित होते. भविष्यामध्ये धम्मकार्य अधिक गतिमान करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा शाखा मुरबाड तालुका काम करणार आहे. तालुक्याचे नवीन अध्यक्ष दिलीप धनगर आणि सर्व कार्यकारणीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

११ वी कला व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

पाथर्डी (स. गांवकरी) : दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय आदिनाथनगर येथे ११वी कला व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आनंदात पार पडला. या कार्यक्रमासाठी दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे सचिव श्री नितीन शिंदे व अण्णासाहेब शिंदे कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री सुनील वानखडे, दादापाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्री आर.जे टेमकर व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य श्री ए एन काळे, स्टाफ सेफेटरी श्री डि एम गायकवाड व सर्व शिक्षक शिक्षकेतर स्टाफ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य श्री अशोकराव काळे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात असणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. दादापाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाला सामोरे जाऊन उत्तुंग यश प्राप्त करावे, असा संदेश दिला. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे सचिव श्री नितीन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रम यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्री. राजकुमार घुले यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालया बाबत माहिती दिली. या स्वागत समारंभ कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आर. सी. इंगळे यांनी केले. आभार डॉ. बबनराव टिळेकर यांनी मानले.

'नागरिक सोशल फाउंडेशन' तर्फे 'आदर्श मंदिर स्पर्धा २०२६'चे आयोजन

पुणे (स. गांवकरी) : पुणे हे विद्येचे माहेरघर असण्यासोबतच सांस्कृतिक वारसा आणि मंदिरांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. मंदिरांमधील संस्कृती जपणे, स्वच्छता, पर्यावरणपूरक उपक्रम आणि उत्तम व्यवस्थापनाद्वारे मंदिरांचा कायापालट करणे या उद्देशाने 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या 'भक्ती शक्ती' विभागामार्फत 'आदर्श मंदिर स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या वतीने सायली गोडबोले - जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नागरिक सोशल फाउंडेशनचे संचालक अमेय सप्रे, सीए सर्वेश मेहेंदळे , चंद्रशेखर शिरुडे, पूजा भंडारे, सुधीर जोशी आदी उपस्थित होते. मंदिरं ही केवळ धार्मिक स्थळं नसून ती समाजप्रबोधन आणि शिस्तीची केंद्रे आहेत. जुन्या आणि दुर्लक्षित मंदिरांना पुन्हा प्रकाशझोतात आणणे, मंदिरांविषयी समाजात आस्था निर्माण करणे आणि ही मंदिरे आपल्या सांस्कृतिक वैभवाचा पाया आहेत, हे अधोरेखित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. ही स्पर्धा १५ जुलै २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत पार पडणार आहे. स्पर्धा पूर्णतः विनामूल्य आहे. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मंदिरांना रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम पारितोषिक: ३१,०००/- रुपये, द्वितीय पारितोषिक: २१,०००/- रुपये, तृतीय पारितोषिक: ११,०००/- रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक: ७,५००/- रुपये अशी पारितोषिकं असणार आहेत. आपल्या संस्कृतीच्या जतनासाठी आणि मंदिरांच्या आधुनिक व्यवस्थापनासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त मंदिरांनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवावा, असे आवाहन 'नागरिक सोशल फाउंडेशन'तर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आणि सहभागासाठी इच्छुक मंदिरांनी 9970154167/ 9822848287 या क्रमांकावर 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या 'भक्ती शक्ती' विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

महापौरांच्या हस्ते डॉक्टर दिनानिमीत्त विविध उपक्रमांचे उदघाटन

ठाणे (स. गांवकरी) : जागतिक डॉक्टर्स दिनानिमीत्ताचे औचित्य साधून ठाणे महापालिकेने शहरातील नागरीकांसाठी मोफत एम्बुलन्स सेवा, मोफत रक्त तपासणी रिपोर्ट आदी सेवांचे लोकार्पण महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील तसेच पालिकेतील सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झाले. याचवेळी रोटरी च्या विविध क्लबनी क्षय रूग्णांच्या कुटुंबांसाठी २०० नि:क्षय अन्नधान्य किटचे वाटप केले. यावेळी रोटरीचे नियोजित गर्व्हनर चंद्रहास शेट्टी व मेडीकल डायरेक्टर डॉ. सोनल बांगडे तसेच रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते. रोटरी क्लबतर्फे दर महिन्याला २०० कुटुंबाना नि:क्षय अन्नधान्य किटचे वाटप विनामुल्य करण्यात येते. रोटरी क्लब ऑफ ठाणे लेक सिटीचे अध्यक्ष , रोटरी क्लब ऑफ प्रिमीयमचे अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ रॉयल्सचे अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ ठाणे ग्रीन सिटीचे अध्यक्ष यांच्या सौजन्याने तसेच पालिकेतील पदाधिकारी यांच्या हस्ते नि:क्षय किट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन ठामपा आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यानी केले. चंद्रहास शेट्टी यानी ठाणे महापालिकेने विविध उपक्रमात रोटरीचा सहभाग करून घेतल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. तसेच यापुढील काळातही रोटरी क्लबतर्फे नि:क्षय मित्र किटचे वाटप सुरू ठेवले जाईल अशी ग्वाही दिली.

नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे : जिल्हाधिकारी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध व नागरिकाभिमुख करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि महानगरपालिकेच्या वतीने डीएसपी चौक व कायनेटिक चौक येथे दि. ४ ते १० जुलै २०२६ या कालावधीत वाहतुकीचा ट्रायल रन राबविण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत करणे, वाहतूक कोंडीची समस्या कमी करणे, अपघातांचे प्रमाण घटविणे तसेच नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

नवीन वाहतूक व्यवस्था कायमस्वरूपी लागू करण्यापूर्वी तिची परिणामकारकता प्रत्यक्ष तपासणे आवश्यक असल्याने हा ट्रायल रन आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनचालकांनी संयम बाळगून वाहतूक पोलिसांनी दिलेल्या

अहिल्यानगर शहरातील डीएसपी व कायनेटिक चौकात ४ ते १० जुलै दरम्यान वाहतुकीचा ट्रायल रन

सूचनांचे पालन करावे. या प्रायोगिक कालावधीत नागरिकांचे सहकार्य, सूचना आणि अभिप्राय प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, अभिप्राय आणि प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे वाहतूक व्यवस्था भविष्यात अधिक प्रभावी, सुरक्षित व नागरिकांच्या सोयीची करण्यात येणार आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सुरक्षित वाहतूक संस्कृती रुजविण्यासाठी सर्व नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

येरवडा कारागृह : सह्याद्री हॉस्पिटलकडून आरोग्य शिबिर

पुणे : (स. गांवकरी)

राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधत सह्याद्री हॉस्पिटल, शास्त्रीनगर, येरवडा (मणिपाल हॉस्पिटल्स नेटवर्क) यांच्या वतीने येरवडा मध्यवर्ती कारागृह आणि येरवडा खुले कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दोन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी व वैद्यकीय सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले. १ व २ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी हे चोवीस तास जबाबदारीचे कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी व्हावी, विविध आजारांचे लवकर निदान व्हावे आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मा. डॉ. सुहास वारके (आयपीएस), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, मा. योगेश देसाई, विशेष कारागृह

महानिरीक्षक, तसेच कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले.

शिबिराचे उद्घाटन कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी कारागृह कर्मचारी वर्षभर अत्यंत तणावपूर्ण वातावरणात सेवा बजावत असल्याने त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी अशा स्वरूपाच्या आरोग्य शिबिरांचे आयोजन ही काळाची गरज असून भविष्यातही अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे होते. सह्याद्री हॉस्पिटलच्या संचालिका नेहा सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पथकाने शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले. "निरोगी कर्मचारी, सशक्त संस्था, निरोगी समाज" या संकल्पनेवर आधारित या शिबिरात विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभागी होत मोफत तपासणी व वैद्यकीय मार्गदर्शन केले. कर्करोग, स्त्रीरोग, बालरोग, हृदयरोग, सामान्य वैद्यक, फिजिओथेरपी, आहार मार्गदर्शन तसेच नेत्र तपासणी अशा विविध विभागांतील सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. शिबिरात कर्करोग तज्ज्ञ डॉ. महिमा खरबंदा, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कैरॉन शर्मा, बालरोग तज्ज्ञ डॉ. दिनेश ठाकरे, हृदयरोग व जनरल फिजिशियन डॉ. सोनाली कवठेकर, फिजिओथेरपिस्ट डॉ. देवश्री भोपळे, आहारतज्ज्ञ आरती भालेराव तसेच नेत्रतपासणी तज्ज्ञ लिंटा सॅम्युअल यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. आरोग्य शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, स्त्रीरोग, बालरोग, कर्करोग जनजागृती, नेत्र तपासणी, आहार सल्ला, फिजिओथेरपी मार्गदर्शन अशा विविध तपासण्या मोफत करण्यात आल्या. "आपले आरोग्य, आपली जबाबदारी" हा संदेश देत अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून या उपक्रमाचा लाभ घेतला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सह्याद्री हॉस्पिटलच्या संचालिका नेहा सिंग, मार्केटिंग प्रमुख विशाल शेडगे, डॉ. राहुल मगर, शिवकुमार हत्तरकी, डॉ. समृद्धी गुंडाळे यांच्यासह येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, श्रीमती निशा श्रेयकर तसेच दोन्ही कारागृहांतील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

आरोग्य सेवेत निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही

शासकीय रुग्णालयांवर विश्वास वाढवून संस्थात्मक प्रसूतींना प्राधान्य द्या – सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, पारदर्शक आणि तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करावे. रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविणे, कट प्रॅक्टिसला प्रोत्साहन देणे किंवा शासकीय यंत्रणेतील उपलब्ध सुविधांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, ईएमएस समन्वयक आणि कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित या बैठकीसाठी आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ईएमएस समन्वयक तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आरोग्य मंत्री पुढे म्हणाले की, राज्यातील १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय रुग्णालयात किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांमध्ये पाठविल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या सर्व प्रकरणाचा मागील सहा महिन्यांचा रेफरल डेटा तपासण्यात यावा. ज्या ठिकाणी अनियमितता आढळेल, तेथे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे.रुग्णाला अनावश्यकपणे खासगी रुग्णालयात पाठविले जात असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. याबाबत सर्व जिल्ह्यांनी सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर करावा. राज्यातील प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध राहावी, यासाठी नियमित आणि प्रभावी देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले. शासनाने आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही कामामध्ये दिरंगाई अथवा निष्काळजीपणा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

ढासळलेली कायदा व सुव्यवस्था; न्यायासाठी लढा उभारणार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

"आजच्या परिस्थीमध्ये काही अधिकारी, कर्मचारी व कामगार हे मनमानी पद्धतीने काम करीत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. यावर काम करण्यासाठी आम्ही काही लोक एकत्र येऊन काम करण्याचे ठरविले आहे कारण याची झळ आम्ही स्वतःच सोशीत आहोत. माझ्यासारखा सामाजीक विचार करणारा माणूसच जर या चक्रात आहे तर समाजात सामान्य मजूर, शेतकरी यांची काय अवस्था आहे हे मी माझ्या डोळ्याने पोलीस स्टेशन व तहसिल कचेरी येथे पहात आहे. लोकांची न्यायासाठी भिकाऱ्यासारखी अवस्था झाली आहे. भिकाऱ्याची तरी कोणाला दया येईल त्याचे काम कसे बसे भागत आहे पण या लोकांची अवस्था भिकाऱ्यापेक्षाही कठीण झाली आहे," असे आधार गटाचे संस्थापक व सामाजिक कार्यकर्ते विलास (अण्णा) वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ते पुढे म्हणाले, "या व अशा अनेक यंत्रणा समाजाला अशा प्रकारच्या वागणुकीमुळे यावर काम करणे खूपच महत्वाचे झाले आहे. आणी म्हणून शेंडी तुटो की पारंबी तुटो काम केल्याशिवाय पर्याय नाही कारण असेही आमचे हालचं आहे. लढून मरण चांगले असे आम्ही विचार केला आहे. त्यामुळे आमच्या लढाईमुळे जर आम्ही चार लोकांना न्याय देऊ शकलो तर आंम्ही त्यातच धन्यता मानू." यावेळी सामाजिक कार्यकर्ते अशोक सब्बन, सरकारी शाळा वाचवा न्याय व हक्क परिषद सुदाम लगड आदी उपस्थित होते.

३, ४ ,५ जुलै रोजी उद्योजक प्रदर्शन व विक्री स्टॉलचे उद्घाटन

महिला उद्योजक व छोटे उद्योजकांचे विक्री व ब्रँडिंग व प्रचारासाठी प्रदर्शनाची गरज : महापौर ज्योतीताई गाडे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

ही फक्त बाजारपेठ नाही.ही आपल्या मातीतले कष्टकरी हातांना आधार देणारी चळवळ आहे.ही स्वदेशी वस्तूंचा प्रोत्साहन देणारी अभिमानाची संधी आहे. उद्योजक महिला बचत गट शेतकरी आणि तरुणांसाठी नवीन दिशा आहे. आवडीच्या वस्तू,गुणवत्ता आणि रास्त दर आता एकाच छताखाली उपलब्ध करण्यात आले आहे.

या प्रदर्शन व विक्री मेळाव्यातून महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच महिला उद्योजकांसाठी एक व्यासपीठ निर्माण झाले आहे. महिला उद्योजक व छोटे उद्योजकांचे विक्री व ब्रँडिंग व प्रचारासाठी प्रदर्शनाची गरज आहे. असे प्रतिपादन महानगरपालिकेचे महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी केले आहे.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) अमृत व प्रतिबिंब संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शमी गणपती हॉल,दिल्लीगेट येथे बचत गटांचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.या प्रसंगी

उपमहापौर धनंजय जाधव, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा,माजी सभापती नरेंद्र कुलकर्णी,शमी गणपती मंदिर अध्यक्ष विनायक देशमुख,अमृत जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे, संयोजिका अनुजा कांबळे, वनिता मानकर,जयश्री सूळ,ऋतुजा धोत्रे, प्रिया भागवत आदिंसह महिला उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उप महापौर धनंजय जाधव म्हणाले, या प्रदर्शन व मेळाव्यातून महिलांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.तसेच महिलांना उद्योग व्यवसायासाठी चांगली संधी निर्माण झाली आहे.नगरकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी.

अनुजा कांबळे म्हणाले,या प्रदर्शना मध्ये कपडे, ज्वेलरी, कॉस्मेटिक्स, किड्स वेअर, फूड स्टॉल, आयुर्वेद, उन्हाळी वाळवण,गृहपयोगी वस्तू आदींचे स्टॉल उपलब्ध आहेत.प्रतिबिंब संस्था व स्थानिक उत्पादकांनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे 'अमृतपेठ-थेट बाजारपेठ' हा विशेष उपक्रम राबवला जातो.अहिल्यानगर मध्ये मार्च व में महिन्यात भरलेल्या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला होता.त्यामुळे आता पुन्हा एकदा या उपक्रमाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले असून, 3,4 व 5 जुलै 2026 रोजी बचत गटांचे प्रदर्शन व विक्री ग्राहकांसाठी खुली करण्यात आली आहे.नगरकरांनी या प्रदर्शनाला भेट देऊन उद्योजकांचा उत्साह वाढवावा.

सागर भोपे म्हणाले,अमृत संस्था व प्रतिबिंब संस्था-अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वदेशी आणि दर्जेदार उत्पादने हे अमृतपेठ चे वैशिष्ट्य असून,ग्राहक आणि उत्पादक अशा दोघांसाठीही हा उपक्रम फायद्याचा ठरतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा धोत्रे यांनी केले तर आभार नक्षत्रा कांबळे यांनी मानले.

थोडक्यात पण महत्वाचे

बंजारा तांड्यातील ५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

- कृषीदिन व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त उपक्रम

पाथर्डी (स. गांवकरी) : श्री वसंतराव नाईक वाचन मंदिर या संस्थेचा पाथर्डी तालुक्यातील सर्व जि. प. प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम इतरांना प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन गट शिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांनी केले. राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती आणि मृद व जलसंधारण मंत्री ना.संजय राठोड यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तालुक्यातील कोकिसपीर तांडा , शेकूचा तांडा, पवार तांडा,सेवागड,वाघदरातांडा,काकडदरा, घुमटवाडी,पत्र्याचातांडा,रुपलाचातांडा ,हरीचातांडा ,कुरणतांडा,आंबेवाडी, सद्गुरू वाडी,शिरापूर करडवाडी,खंडोबावाडी,हनुमान नगर,भगवान गड तांडा, मिडसांगवी तांडा, सेवानगर, वसंतराव नाईक नगर,गणेश नगर, शिक्षक कॉलनी, आनंद नगर आणि मुकबधिर विद्यालयासह २५ लमाण तांड्यातील जि.प. शाळेतील सुमारे ५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.त्या प्रसंगी कराड बोलत होते. यावेळी नगरसेवक बजरंग घोडके, शिक्षक बँकेचे माजी चेअरमन अर्जुन शिरसाठ, संस्थेचे अध्यक्ष तथा संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा समृद्धी योजनेचे जिल्हास्तरीय माजी अशासकीय सदस्य विष्णुपंत पवार, डॉ. संदीप पवार,माजी मुख्याध्यापक भागवत राठोड, दत्तात्रय पवार, सचिन चव्हाण ,काळू जाधव, विलास पवार, संदीप राठोड, गणेश कांबळे हे उपस्थित होते.

उदनापूर येथील सरकारी जमिनीच्या कथित गैरव्यवहाराची चौकशी करा

लोणार, बुलढाणा (स. गांवकरी) : लोणार तालुक्यातील ग्राम मौजे उदनापूर येथील सरकारी व ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सार्वजनिक जागेवर झालेल्या कथित अतिक्रमण, सरकारी जमिनीची विक्री तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे करण्यात आलेल्या बांधकामाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे ता. २ ला करण्यात आली आहे. साप्ताहिक आर.टी.आय. प्रचारचे संपादक विलास जे. खंडेराव यांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा, मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. उपमुख्य अधिकारी जि.प.बुलडाणा, मुख्यमंत्री, महसूल मंत्री, महसूल सचिव यांच्याकडे दिलेल्या तक्रारीत अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तक्रारीनुसार, उदनापूर येथील गट क्रमांक १, ६, ११३, १७९, १८० व १९२ मधील अंदाजे २० एकर सरकारी जमीन तत्कालीन सरपंच विलास मुळे यांच्या मदतीने विक्री करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या व्यवहारात कोणाचा आर्थिक हितसंबंध होता, सरकारी जमिनीची विक्री करण्याचा अधिकार संबंधितांना कोणी दिला आणि या प्रकरणात कोणते शासकीय अधिकारी सहभागी होते, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समृद्धी महामार्गालगत महाराष्ट्रात प्रतिबंधित सुगंधी तंबाखु, गुटखा वाहतुक

- ६९ लाख ३३ हजार रुपयांच्या गुटखा साठ्यासह कंटेनर जप्त करून इगतपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

इगतपुरी (स. गांवकरी) : तालुक्यातील पिंप्रीसदो फाट्याजवळील समृद्धी महामार्गाचा वापर करून राज्यात व बाहेर अन्य जिल्ह्यांत होणारी राज्यातील प्रतिबंधित सुगंधी तंबाखु, गुटखा तस्करी होत असतांना इगतपुरी पोलीस आणि अन्न प्रशासन यंत्रणा यांनी सापळा रचुन सुमारे ६९ लाख ३३ हजार रुपयांचा गुटखा, सुगंधीत तंबाखुसह वाहतुक करणारे कंटेनर जप्त करून ३ जनांना ताब्यात घेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार पोलीस निरीक्षक सारीका अहिरराव यांना प्रतिबंधीत गुटख्याची वाहतुक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्या आधारे त्यांनी अन्न प्रशासन विभागाच्या पथकासह पोलीस पथकाने सापळा रचुन पिंप्री सदो समृद्धी टोलनाका इंटरचेंज जवळ गुरुवार दि.२ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास अवैधरीत्या बंदी असलेली सुगंधित तंबाखू, जर्दा, गुटखा वाहतूक करणारा कंटेनर पकडला. या कंटेनरमधुन ६९ लाख ३३ हजार रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. गुटखा तस्करीसाठी वापरण्यात आलेला कंटेनर ही पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी फिर्यादी सुहास जिभाऊ मंडलिक, वय ५४ वर्षे, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन (म.रा.), सह आयुक्त नाशिक विभाग यांच्या फिर्यादीवरून राजेश गोवर्धनलालजी वर्मा (माळी) वय ५३, रा डोसीगांव ता. जि. रतलाम, मध्यप्रदेश, जालीम सिंग, रा. सेन्ट्रल पॉईंट, इंदोर, मध्य प्रदेश, व एका मोबाईल नंबर वरील कॉल करणारा अज्ञात इसम (नाव गाव माहित नाही) या ३ संशयित आरोपींवर इगतपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल गामधनी, गोपनिय पोलीस निलेश देवराज, अभिजित पोटींदे, दिपक मोरे, सचिन बाबा, विजय रूद्रे, मधुकर पवार आदी पोलीस पथक पुढील तपास करीत आहे.

लंके शिवसेनेत जाणार नाहीत; पवार घराण्याशी एकनिष्ठ राहतील : रोकडे

पारनेर (स. गांवकरी) : अहिल्यानगरचे खासदार निलेश ज्ञानदेव लंके यांच्या शिवसेना शिंदे गटात प्रवेशाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हा प्रवक्ते मोहन रोकडे यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही परिस्थितीत लोकनेते खासदार निलेश लंके हे शिवसेनेत जाणार नाहीत. ते पवार घराण्याशी पूर्ण एकनिष्ठ राहतील. सध्या सोशल मीडियावर आणि राजकीय वर्तुळात निलेश लंके यांच्या पक्षांतराच्या अफवा जोरात पसरल्या होत्या. मूळचे शिवसैनिक असल्याने लंके यांचा शिंदे गटाशी संपर्क असल्याच्या चर्चा होत होत्या. मात्र मोहन रोकडे यांनी यास कडाडून विरोध दर्शवला. "खासदार निलेश लंके साहेब हे शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खंबीर स्तंभ आहेत. पवार साहेबांच्या विश्वासावर त्यांनी अहिल्यानगर मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवली आणि जनतेचा मोठा विश्वास संपादन केला. पक्षांतराची कोणतीही शक्यता नाही," असे रोकडे यांनी सांगितले. निलेश लंके यांचा राजकीय प्रवास प्रेरणादायी आहे. पारनेर तालुक्यातील सामान्य कुटुंबात जन्मलेल्या लंके यांनी सुरुवातीला शिवसेनेत काम केले. तालुका प्रमुख पद भूषवले. नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पारनेर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले.

नेवासेच्या डॉक्टरने बनवला भारताचा 'इंधनशोधक'

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते अधिकृत लॉन्च : आमदार लंघे पाटील,नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांची प्रमुख उपस्थिती

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष व नेवासा येथील अस्थिरोग शल्यचिकित्सक डॉ. किशोरकुमार जयराम गळनिंबकर यांनी स्वतःच्या प्रयत्नाने व कोणत्याही शासकीय निधीशिवाय विकसित केलेल्या "इंधनशोधक™या भारताच्या पहिल्या सामुदायिक रिअल टाइम इंधन उपलब्धता ट्रॅकिंग मोबाईल अँपचे अधिकृत लॉन्च राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्हयाचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मुंबई येथे करण्यात आले.

या ऐतिहासिक क्षणाच्या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः अँप आपल्या हाती घेऊन त्याचा वापर अनुभवला व इंधनशोधकला आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला.यावेळी नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांनी ही या लॉन्च सोहळ्यात प्रमुख उपस्थिती लावून अँपचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

इंधनशोधक™ (www.indhanshodhak.in) हे भारताचे पहिले असे मोबाईल अँप आहे जे नागरिकांना त्यांच्या जवळच्या पेट्रोल पंपावर पेट्रोल, डिझेल व CNG ची उपलब्धता रिअल टाइम मध्ये दाखविते. इंधन संकटाच्या काळात रांगेत उभे राहण्यापूर्वीच नागरिकांना इंधन कुठे उपलब्ध आहे हे घरी बसून कळू शकते.

थेट GPS नकाशा - जवळच्या पंपाची रिअल-टाइम पेट्रोल/डिझेल/CNG उपलब्धता सामुदायिक रिपोर्टिंग पंप मालक द्वि-स्तरीय सत्यापन - विश्वासार्ह डेटा संकटकाळात QR-आधारित इंधन रेशनिंग प्रणाली- काळाबाजार प्रतिबंध,सरकारी जिल्हा निरीक्षण डॅशबोर्ड कोणत्याही शासकीय यंत्रणेला विनामूल्य १२ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असून सर्व २८ राज्यांमध्ये विस्तार योग्य शासकीय गुंतवणूकः शून्य (१०) पूर्णपणे स्वयंनिर्मित व स्वयंवित्तपोषित असल्याची माहिती नेवासा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत डॉ.गळनिंबकर बोलतांना दिली

यावेळी नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,डॉ. वरुणराज देवरे उपस्थित होते अधिकृत नोंदणी व मान्यता MSME नोंदणी: UDYAM-MH-01-0299118 कॉपीराइट: SW-26937/2026-CO (भारत सरकार, दिल्ली)PMO संदर्भ: PMOPG/E/2026/0115156 (पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय)CM कार्यालयः मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातून ACS FCS&CP यांना थेट पाठविले आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे स्वाक्षरित शिफारस पत्र PPAC/PNGRB/MoPNG ला सादर केला असल्याचे डॉ.किशोरकुमार गळनिंबकर यांनी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना सांगितले. मार्च-जून २०२६ मध्ये Hormuz सामुद्रधुनी संकटाच्या काळात भारतात पेट्रोल पंपांवर मोठ्या रांगा लागल्या होत्या. केंद्र शासनाला आपत्कालीन इंधन निर्बंध लागू करावे लागले होते. याच पार्श्वभूमीवर इंधनशोधक सारख्या रिअल-टाइम प्लॅटफॉर्मची गरज किती महत्त्वाची आहे, हे सिद्ध झाले आहे. हे अँप १४० कोटी भारतीयांच्या सेवेसाठी सक्षम असून केंद्र शासनाच्या PPAC, PNGRB व MoPNG या संस्थांना याचा राष्ट्रीय स्तरावर उपयोग करण्याची विनंती करण्यात आली आहे.

> "इंधनशोधक हे नेवासासारख्या छोट्या गावातून निर्माण झालेले एक अत्यंत उपयुक्त आणि दूरदर्शी तंत्रज्ञान आहे. एका डॉक्टरने कोणाच्याही मदतीशिवाय हे बनवावे, यातच या उपक्रमाची ताकद दिसते. महाराष्ट्र शासन या अँपला सर्वतोपरी पाठिंबा देईल."
>
> **- मा. राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र शासन**

५ व ६ जुलै रोजी पंढरपूरकडे रवाना होणार

निमगाव सावा : (स. गांवकरी)

श्री विठोबा सेवा प्रतिष्ठान, शिरोली यांच्या वतीने पंढरीनाथ श्री पांडुरंगाच्या कृपेने आयोजित करण्यात आलेला श्री संत कोंडाजी बाबा डेरे पायी पालखी सोहळा यंदा चौथ्या वर्षात पदार्पण करत असून रविवार दि. ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता शिरोली-सुलतानपूर येथील श्री विठ्ठल मंदिरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे मोठ्या भक्तिमय वातावरणात प्रस्थान करणार आहे. हा पालखी सोहळा शिरोली, सुलतानपूर, साळवाडी, निमगाव सावा, औरंगपूर व पारगाव तर्फे आळे, पिंपरी कावळ, जांबुत या गावांतून मार्गक्रमण श्री क्षेत्र पंढरपूरच्या दिशेने रवाना होणार आहे. या सोहळ्यात शेकडो वारकरी, भाविक, भजन मंडळे, टाळ-मृदुंगाच्या गजरात सहभागी होणार असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी वारकरी साहित्य परिषद, पुणेचे ह.भ.प. भाऊसाहेब महाराज हांडे, जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प. गंगाराम बाबा डुंबरे, खजिनदार ह.भ.प. दत्ता महाराज वाघ यांच्यासह परिसरातील अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून पालखी सोहळ्यास शुभेच्छा देणार आहेत.

पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी विशेष सेवा उपक्रमही राबविण्यात येणार आहे वारकऱ्यांना चांगल्या प्रतीच्या प्रवासी बॅगचे मोफत वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. पालखी सोहळ्याला शिरोली, सुलतानपूर, निमगाव सावा तसेच परिसरातील ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

दिवा प्रभागातील नालेसफाईचा उडाला बोजवारा

ठाणे : (स. गांवकरी)

माजी नगरसेवक हिरा पाटीलांचा पालिका प्रशासनावर रोष

दिवा प्रभागातील पावसाळ्यापूर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईच्या कामाबाबत पूर्णतःहा बोजवारा उडाला आहे या कामात मोठा घोळ उघड झाल्याचा दावा माजी नगरसेवक हिरा पाटील यांनी केला आहे. त्यांनी ठाणे महानगरपालिका प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित करत नालेसफाईच्या कामातील निविदा प्रक्रिया, अंमलबजावणी आणि देखरेखीवर टीका केली आहे.

ठाणे महानगरपालिकेने २०२६-२७ या वर्षासाठी नऊ प्रभागांतील मान्सूनपूर्व नालेसफाईसाठी तब्बल ११.३२ कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी दिली. त्यामध्ये दिवा प्रभागासाठी सुमारे १.६० कोटी रुपयांचा अंदाजित निधी मंजूर करण्यात आला होता. या कामासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. दोन वेळा मुदतवाढ देऊनही केवळ मे. अभिषेक कन्स्ट्रक्शन या एकाच ठेकेदाराची निविदा प्राप्त झाली. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराची निविदा मंजूर करण्यात आली. विशेष म्हणजे अंदाजित खर्चापेक्षा ८.८९ टक्के कमी दराने ही निविदा स्वीकारण्यात आल्याचे कागदपत्रांमध्ये नमूद आहे. मात्र, हिरा पाटील यांनी दावा केला की, एवढा मोठा निधी खर्च करूनही दिवा परिसरातील अनेक नाले आजही गाळाने भरलेले असून अनेक ठिकाणी पावसाचे पाणी तुंबत आहे. त्यामुळे प्रत्यक्षात नालेसफाई झाली का, झाली असेल तर कितपत दर्जेदार झाली, याची चौकशी करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले असून निविदा प्रक्रियेत एकच ठेकेदार सहभागी होणे, त्यालाच काम मंजूर होणे आणि त्यानंतरही नागरिकांना पावसाळ्यात त्रास सहन करावा लागणे, हे अत्यंत गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी त्यांनी केली. ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन पाटील यांनीही या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत पालिका प्रशासनाला जाब विचारला आहे. दिवा परिसरात प्रत्येक वर्षी नालेसफाईवर कोट्यवधी रुपये खर्च होत असताना नागरिकांना पाणी तुंबण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याने या खर्चाचे सामाजिक लेखापरीक्षण (सोशल ऑडिट) करण्याची मागणी त्यांनी केली.

महादजी शिंदे विद्यालयाचा राज्यात डंका

रुद्र होले जिल्ह्यात प्रथम, राज्यात आठवा

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने नुकताच इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर केला असून, श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत राज्यस्तरावर आपला ठसा उमटवला आहे.

विद्यालयाचा विद्यार्थी रुद्र रवींद्र होले याने २८२ गुण मिळवत अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम तर महाराष्ट्र राज्यात आठवा क्रमांक पटकावला. तसेच इयत्ता पाचवीतील आयुष सचिन कोथिंबिरे याने २३३ गुण मिळवत शहरी सर्वसाधारण गटातून शिष्यवृत्ती मिळवली. विद्यालयाचे एकूण सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरल्याने परिसरातून विद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या उल्लेखनीय यशामागे शिष्यवृत्ती विभागाचे नियोजनबद्ध मार्गदर्शन, शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत असल्याचे विद्यालयाने सांगितले.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख प्रदीप मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अजय शिंदे, संदीप बिरंगळ आणि ज्योत्स्ना लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी प्रशिक्षण दिले.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख रामदास शिंगाडे यांच्या नेतृत्वाखाली मराठी विषयासाठी संदीप बिरंगळ व विकास दराडे, गणितासाठी रामदास शिंगाडे व अंकुश हिंगणे, इंग्रजीसाठी माधुरी सरोदे, तर बुद्धिमत्ता विषयासाठी श्रीमती नलगे व निखिल कवडे यांनी विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन करून या यशात मोलाचे योगदान दिले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सुनिता काकडे, उपप्राचार्य शहाजी एकाड, प्राचार्य दिलीप भुजबळ, मा कुडलिक दरेकर, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य माजी मंत्री बबनराव पाचपुते तसेच माजी आमदार राहुल जगताप यांनी यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिष्यवृत्ती विभागातील सर्व विभागप्रमुख व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशीच यशस्वी कामगिरी करून विद्यालयाचे व तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

कनाशीसह पश्चिम पट्ट्यात पावसाचा रुद्रावतार

कनाशी : (स. गांवकरी)

- नदी-नाले तुडुंब, दळणवळण ठप्प, घरांत शिरले पाणी
- पेरण्या झाल्यावरच आभाळ फाटले
- शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी, जनजीवन विस्कळीत

कळवण तालुक्यातील कनाशीसह संपूर्ण पश्चिम पट्ट्यात आज गुरुवारी सकाळपासून पावसाने रौद्र रूप धारण केले आहे. दिवसभर कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे नदी-नाले, ओढे तुडुंब भरून वाहू लागले असून अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी अवघे दोन दिवसांपूर्वी खरिपाच्या पेरण्या उरकल्या होत्या. मात्र आज सकाळपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने शेतशिवार जलमय झाले. अनेक शेतातून पाणी वाहून गेल्याने बियाणे व खते वाहून गेली. 'पेरणीचा खर्च निघेल की नाही' या चिंतेने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. कनाशी परिसरातील अनेक रस्ते पाण्याखाली गेल्याने दळणवळण पूर्णपणे ठप्प झाले आहे. काही दुर्गम पाड्यांचा संपर्क तुटल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. शाळा-महाविद्यालयात जाणारी मुले व नोकरदार वर्ग जागेवरच अडकून पडला. पावसाचा जोर इतका होता की अनेक गावांत घरांमध्ये, चाळीत पाणी शिरले. पुढील २४ तास नाशिक घाटमाथ्यावर अतिवृष्टीचा 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, नदी-नाल्यांच्या पुलावरून वाहतूक करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. दोन दिवसांपूर्वी वरुणराजाची वाट पाहणारा बळीराजा आज त्याच्याच तडाख्याने हवालदिल झाला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचा उपबाजार मंजूर शासनाची राजपत्रात अधिसूचना

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समितीचा उपबाजार सुरू करण्यास शासनाने अधिकृत मान्यता दिली आहे. यासंदर्भातील अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी स्थानिक स्तरावरच बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा यांनी १८ मार्च २०२६ रोजी झालेल्या सभेत पेडगाव येथील गट क्रमांक ५६७ मधील ०.४० आर जागा २९ वर्षांच्या भाडेकराराने घेऊन तेथे उपबाजार सुरू करण्याचा ठराव मंजूर केला होता. या प्रस्तावानुसार २७ एप्रिल २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करून नागरिक, शेतकरी, व्यापारी, आडते, दलाल व संबंधितांकडून ३० दिवसांच्या आत हरकती मागविण्यात आल्या होत्या. मात्र, मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नसल्याने पुढील कार्यवाही करण्यात आली. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम ५ (१) व (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर मंगेश सुरवसे यांनी मौजे पेडगाव येथील संबंधित जागा कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदासाठी अधिकृत उपबाजार म्हणून घोषित केली आहे.

या उपबाजारात नियमन केलेल्या शेतमाल व कृषी वस्तूंची खरेदी-विक्री होणार असून शेतकऱ्यांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे पेडगाव, शेडगाव, काष्टी तसेच परिसरातील गावांतील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही. वाहतूक खर्चात बचत होण्याबरोबरच शेतमाल विक्रीची अधिक सुलभ व पारदर्शक व्यवस्था उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राजपत्रातील अधिसूचनेनुसार पेडगाव येथील उपबाजारामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्राचा विस्तार होणार असून ग्रामीण भागातील कृषी विपणन व्यवस्थेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

‘नो पार्किंग’च्या नावाखाली बेकायदेशीर दंडवसुली?

एसीबी चौकशीची मागणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर महानगर पालिकेच्या पे-अँड-पार्क ‘नो पार्किंग’ व्यवस्थापनामध्ये नियम उल्लंघन, निविदा प्रक्रियेत फेरफार, शासन महसुलाचे संभाव्य नुकसान, खासगी ठेकेदाराला कायद्याविरुद्ध अधिकार बहाल करणे आणि रॉयल्टीत मोठी कपात करून आर्थिक लाभ मिळवून देणे या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत एसीबी उच्चस्तरीय चौकशीची मागणी सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी केली आहे. यासंदर्भात नगर विकास विभाग, गृह विभाग, पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधीक्षक यांच्याकडे सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. 7 मार्च 2024 रोजी कार्यारंभ आदेश देऊन शहरातील पे-अँड-पार्क व्यवस्थापनासाठी पाच वर्षांचा करार मे. दिग्विजय एंटरप्रायझेस, नाशिक या संस्थेशी केला. मूळ करारानुसार पहिल्या वर्षी 3 लाख, दुसऱ्या वर्षी 3.75 लाख, तिसऱ्या वर्षी 4.50 लाख, चौथ्या वर्षी 5 लाख आणि पाचव्या वर्षी 5.50 लाख अशा एकूण 21 लाख 75 हजार रुपयांची रॉयल्टी महानगरपालिकेला मिळणार होती.

निविदेमध्ये शहरातील एकूण ३६ शुल्क वाहनतळ व रस्ते समाविष्ट करण्यात आले होते. रस्त्यांवर अंदाजे ४,१०० दुचाकी व १,५७० चारचाकी वाहने पार्क होतील, या आधारावर निविदेची आर्थिक रचना निश्चित करण्यात आली होती. मूळ निविदेच्या अटी अस्तित्वात असतानाच श्री. यशवंत डांगे यांनी प्रशासकीय स्थायी समितीचा ठराव क्रमांक ६८२, दि. १२ डिसेंबर २०२५ मंजूर करून ठेकेदाराकडून महानगरपालिकेला मिळणाऱ्या रॉयल्टीमध्ये मोठी कपात केली. सुधारित दरानुसार पहिल्या वर्षी १ लाख, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी प्रत्येकी १.२५ लाख, चौथ्या वर्षी १.७५ लाख आणि पाचव्या वर्षी २ लाख अशी एकूण केवळ ७.२५ लाख रुपयांची रॉयल्टी निश्चित करण्यात आली. त्यामुळे मूळ कराराच्या तुलनेत महानगरपालिकेचे सुमारे १४.५० लाख रुपयांचे संभाव्य आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापुढे प्रशासकीय ठराव क्रमांक ७१७, दि. २० जानेवारी २०२६ द्वारे या सुधारित अटींनाही मान्यता देण्यात आली. विशेष म्हणजे, संबंधित ठेकेदाराने ज्या दराने रॉयल्टी देण्याची तयारी दर्शविली, त्याच दरांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आल्याने निर्णय प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मूळ निविदेत नसतानाही शहरातील आणखी आठ नवीन रस्त्यांवर पार्किंग शुल्क वसुलीची परवानगी देण्यात आली. १२ रस्त्यांलगत नो पार्किंग क्षेत्र घोषित करून तेथे कारवाई करण्याचे अधिकारही ठेकेदाराला देण्यात आला आहे. ‘नो पार्किंग झोन’ निश्चित करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे नसताना अशा क्षेत्रांची घोषणा करून खासगी ठेकेदाराला वाहनांवर कारवाई करण्याचे अधिकार बहाल करण्यात आले. मोटार वाहन अधिनियम, 1988 कलम 117, 127 नुसार सार्वजनिक रस्त्यावरून वाहन उचलणे, जप्त करणे, दंड आकारणे व वाहतूक नियमांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार केवळ वाहतूक पोलीस किंवा कायद्याने अधिकृत अधिकाऱ्यांनाच आहे. असे असताना खासगी ठेकेदारामार्फत वाहन उचलून नागरिकांकडून दंड व टोईंग शुल्काची वसुली केली जात असल्याने संपूर्ण कारवाईच्या कायदेशीरतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शहरातील विविध भागांतून उचलण्यात आलेली वाहने छत्रपती संभाजीनगर रोडवरील पोलीस अधीक्षकांच्या निवासस्थानालगत असलेल्या जुन्या शहर वाहतूक शाखेच्या जागेत ठेवली जात आहेत. या जागेचा वापर कोणाच्या आदेशाने करण्यात आला, त्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या लेखी परवानगी आहे का, संबंधित क्रेन व वाहनांवर “शहर वाहतूक शाखा” असा उल्लेख कोणाच्या परवानगीने करण्यात आला, याबतही प्रश्न उपस्थित केले आहेत. याशिवाय गृह विभाग व नगर विकास विभागाच्या शासन निर्णयांनुसार रस्त्यावरील बेवारस वाहनांबाबत स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा, टोल-फ्री क्रमांक व नियमानुसार कार्यवाहीची व्यवस्था उभारणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

थोडक्यात पण महत्वाचे

एकाच दिवशी पिसाळलेल्या कुत्र्याचा ३८ नागरिकांवर हल्ला

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरामध्ये काल पिसाळलेल्या कुत्र्याने अक्षरशः धुमाकूळ घालत ३८ नागरिकांना चावा घेतला. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संपत बारस्कर म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत तीव्र आंदोलन करून मोकाट कुत्र्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या व्यथा मांडणे आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवाज उठवणे हे आमचे कर्तव्य आहे. मोकाट कुत्रे नागरिकांवर जीवघेणे हल्ले करत आहेत. यापूर्वीही एका निष्पाप बालकाचा कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आणखी एखादी दुर्दैवी घटना घडण्याची वाट महापालिका पाहत आहे का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन येत्या आठ दिवसांत प्रभावी उपाययोजना न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

समाजसेविका योगिता शिर्के व टोकावडे पोलिसांची मोलाची कामगिरी

मुरबाड (स. गांवकरी) : टोकावडे-बळेगाव-उमरोली परिसरात अनेक दिवस मुसळधार पावसात भटकत असलेल्या रोहिणी चौधरी या महिलेला समाजसेविका योगिता शिर्के यांनी आधार देत तिची चौकशी केली. महिला मानसिकदृष्ट्या अस्वस्थ नसून रस्ता चुकल्याचे लक्षात येताच त्यांनी टोकावडे पोलिसांशी संपर्क साधला. सहायक पोलीस निरीक्षक शितलकुमार नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अकोले-संगमनेर पोलिसांशी समन्वय साधून महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेतला. नातेवाईक टोकावडे पोलीस ठाण्यात आल्यानंतर रोहिणी चौधरी यांना त्यांच्या ताब्यात देण्यात आले. अनेक दिवसांनी आई परत मिळाल्याने कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. या संवेदनशील आणि मानवतावादी कार्याबद्दल समाजसेविका योगिता शिर्के व टोकावडे पोलीस प्रशासनाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी पारनेरच्या पै. चेतन रेपाळेची निवड

पारनेर (स. गांवकरी) : पारनेरच्या शिव छत्रपती कुस्ती संकुलाचा राष्ट्रीय खेळाडू तथा नगरसेवक पै. युवराज पठारे यांचा भाचा व शिष्य पै. चेतन रेपाळे याची २३ वर्षांखालील वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुणे येथे झालेल्या राज्य निवड चाचणी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत त्याने खुल्या (ओपन) १२५ किलो वजन गटात राष्ट्रीय स्पर्धेचे तिकीट मिळविले आहे. ही राष्ट्रीय स्पर्धा हरियाणातील रोहतक येथे होणार असून, त्याच्या निवडीमुळे पारनेर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पै. चेतन रेपाळे हा सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध सराव आणि जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. यापूर्वी त्याने राजे छत्रपती शिवाजी महाराज १४ वी उत्तर महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे विजेतेपद पटकावून आपली ताकद सिद्ध केली होती. तसेच महाराष्ट्र केसरी २०२४ स्पर्धेतील खुल्या गटात तृतीय क्रमांक मिळविला असून देवाभाऊ केसरी राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. शालेय स्तरावरील अनेक सुवर्णपदके आणि राष्ट्रीय स्पर्धांसाठी झालेली निवड ही त्याच्या यशस्वी कारकिर्दीची साक्ष आहे.

चिरंजीव विराज विनोद गायकवाड याचा वाढदिवस शाळेत उत्साहात



टाकळी ढोकेश्वर (स. गांवकरी) : टाकळी ढोकेश्वर (जि. अहमदनगर) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर येथे चिरंजीव विराज विनोद गायकवाड यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी गायकवाड परिवाराने शाळेच्या विकासासाठी आगळी भेट दिली. विराज गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त परिवाराकडून प्रथमोपचार बॉक्स, झेरॉक्स कागद आणि विविध पुस्तके शाळेस भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फायदा होणार असल्याने सर्वांनी गायकवाड परिवाराचे आभार व्यक्त केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विराज गायकवाड यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. मुलांनी गाणी, कविता आणि छोट्या सादरीकरणाद्वारे कार्यक्रमात सहभाग घेतला. या अनोख्या वाढदिवस साजऱ्याने सामाजिक दायित्वाची जाणीव करून दिली. गायकवाड परिवाराने शालेय शिक्षणाच्या उन्नतीसाठी केलेल्या या योगदानाबद्दल स्थानिक स्तरावर कौतुक व्यक्त होत आहे.

पावसाळ्यात सर्पदंशापासून सावध राहा; साप दिसल्यास मारू नका

ठाणे (स. गांवकरी) : पावसाळ्याच्या प्रारंभानंतर जिल्ह्यात सर्पदर्शन व सर्पदंशाच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, साप दिसल्यास घाबरून न जाता अथवा त्याला मारण्याचा प्रयत्न न करता तात्काळ प्रशिक्षित सर्पमित्र किंवा वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषद ठाणे प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. पावसाळ्यात वाढलेली आर्द्रता, प्रजननाचा हंगाम आणि बिळांमध्ये साचणारे पाणी यामुळे साप मानवी वस्तीकडे व घरांच्या परिसरात येण्याचे प्रमाण वाढते.

एकलव्य शाळेचा अर्धापूर तालुक्यातून सर्वाधिक निकाल

अर्धापूर : (स. गांवकरी)

तालुक्यातील बामणी येथील एकलव्य इंटरनॅशनल स्कूल आणि जुनियर कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्याकडून शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी मधून अर्धापूर तालुक्यामधून सर्वाधिक निकाल प्राप्त केला आहे. यामध्ये अनुक्रमे
अनुष्का बिस्वास (77.85%),गार्गी कल्याणकर (76.51%),शार्विल गोपछडे (72.48%),पार्थ गुरमे (71.81%),किरण राजेगोरे (65.77%),सांची पाईकराव (61.74%)
तालुक्यातून सर्व प्रथम आलेले पहिले सहा विदयार्थी हे एकलव्य शाळेचेच आहेत हि खऱ्या अर्थाने अर्धापूर तालुक्याच्या शैक्षणिक इतिहासातील पहिलीच घटना आहे एकाच शाळेचे पहिले सहा विद्यार्थी पात्र होणे म्हणजे एकलव्य शाळेच्या निकालाची हि उत्तुंग गरुडझेप आहे अशी सर्व पालक व शिक्षण तज्ञामध्ये चर्चा असून सर्व स्तरातून शाळेचे व सर्व पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे. तसेच शाळेची गुणवत्ता सातत्याने वाढत असल्याने शाळेत नवीन प्रवेश घेण्यासाठी पालकांची पहिली पसंती म्हणून एकलव्य शाळेत पालकांची गर्दी वाढत आहे. या निकालाबद्दल गटशिक्षणाधिकारी लोकदाजी गोडबोले, संस्थेचे संस्थापक उद्योजक मारोतराव कंठेवाड, संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता कंठेवाड,सचिव डॉ.श्रद्धाताई कंठेवाड,शाळेचे प्राचार्य रवीन्द्रण आर.,उप-प्राचार्य डॉ.सुनिल काळे,जनसंपर्क अधिकारी भास्कर पाईकराव,प्रशासकीय विभागप्रमुख फयुम शेख शाळेतील सर्व शिक्षक यांनी सुद्धा सर्व गुणवंताचे अभिनंदन केले आहे.

सहकार सप्ताहानिमित्त वृक्षलागवडीने पर्यावरण रक्षणाचा संदेश

वडगाव आनंद : (स. गांवकरी)

सहकार सप्ताहाचे औचित्य साधून आळेफाटा येथील गोमाता दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या वतीने वडगाव आनंद येथील कळमजाई मंदिर परिसरात बुधवारी भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. 'सहकारातून समृद्धी आणि वृक्षलागवडीतून पर्यावरण रक्षण' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत हिरवेगार नंदनवन फुलवण्याच्या उद्देशाने कडुनिंब, वड, पिंपळ, चिंच, गुलमोहर, करंज यांसारख्या बहुगुणी देशी वृक्षांसह विविध शोभिवंत फुलझाडांची लागवड करण्यात आली. ग्रामीण भागातील सहकार चळवळीबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी समाजाने स्वीकारावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष गणेश वाघमारे, उपाध्यक्ष गणेश रामचंद्र देवकर, सचिव अभिषेक कोकाटे यांच्यासह संचालक मंडळ, आळेफाटा व वडगाव आनंद परिसरातील दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच वडगाव आनंदचे उपसरपंच गणेश भुजबळ, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ गढे, वैशाली देवकर, ऋषिकेश गढे, महेंद्र भुजबळ, कमलेश मोरे, कळमजाई देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी आणि तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी श्रमदान करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिकमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष गणेश मारुती वाघमारे म्हणाले, "दुग्ध व्यवसायामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळत असले तरी निसर्गाचा समतोल बिघडल्यास शेती आणि पशुपालनावर त्याचा थेट परिणाम होतो. वाढते तापमान आणि पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता वृक्षारोपण ही काळाची गरज आहे.

आम्ही केवळ झाडे लावली नसून ती जगवण्याचाही संकल्प केला आहे." संस्थेचे सचिव अभिषेक कोकाटे यांनी सांगितले की, वृक्षारोपणाबरोबरच झाडांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक झाडाला नियमित पाणी, खत तसेच जनावरांपासून संरक्षणासाठी ट्री-गार्डची व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेने स्वीकारली आहे.

६००कोती रुपयांची थकीत हमी मंजुरी होऊन ही कर्जवाटपात दिरंगाई होत असल्याच्या निषेधार्थ आत्मदहन इशारा

सोलापूर : (स. गांवकरी)

६०० कोटींची थकहमी मंजूर होऊनही कर्ज वाटपात होणाऱ्या दिरंगाई विरोधात आजचे आमरण उपोषण स्थगित करून, दिनांक १५ जुलै २०२६ रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनात म्हटलं आहे की, आम्ही सर्व सुशिक्षित बेरोजगार तरुण दिनांक ०२ जुलै २०२६ पासून आझाद मैदान, मुंबई येथे आमरण अन्नत्याग उपोषणास बसलो होतो. महाराष्ट्र शासनाने महात्मा फुले महामंडळासाठी ६०० कोटी रुपयांची थकहमी मंजूर करूनही महामंडळ प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे सुशिक्षित बेरोजगार तरुणांना अजूनही कर्ज मिळालेले नाही. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 'NSFDC' ची स्थळ पाहणी रखडलेली आहे आणि 'NSKFDC' चे कर्ज प्रस्ताव मुख्य कार्यालयात येऊनही 'LOI' (मंजुरी पत्र) दिले जात नाही. आमच्या सहकाऱ्यांच्या व सुशिक्षित बेरोजगारांच्या तीव्र भावना आणि प्रशासनाचा संथ कारभार लक्षात घेता, आम्ही आज सायंकाळी हे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करत आहोत. परंतु, हा लढा थांबलेला नाही. जर महामंडळाने तात्काळ पावले उचलून कर्ज मंजुरीची प्रक्रिया सुरू केली नाही, तर मात्र येत्या १५ जुलै २०२६ पर्यंत छत्रपती संभाजीनगर, जळगावसह राज्यातील सर्व पात्र कर्जदारांचे प्रस्ताव मंजूर करून थेट कर्ज वाटप सुरू न झाल्यास, आम्ही सर्व उपोषणकर्ते व सुशिक्षित बेरोजगार तरुण आपल्या महामंडळाच्या कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे 'सामूहिक आत्मदहन' करू. याची सर्वस्वी जबाबदारी महामंडळ प्रशासनाची असेल." असे निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर विकास भास्कर राऊत, प्रवीण बाविस्कर, पंकज अंभोरे यांच्या सह्या असून या निवेदनाच्या प्रति मा. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, .यांच्या सह अनेकाना देण्यात आल्या आहेत.

अंडरब्रिजचे काम रखडल्याने नागरिक हैराण

किनवट : (स. गांवकरी)

किनवट शहरातील शिवाजीनगर रेल्वे अंडरब्रिजच्या दुरुस्तीचे काम २६ जूनपर्यंत पूर्ण होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने यापूर्वी जाहीर केले होते. मात्र जुलै महिना सुरू होऊनही काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक नेते संतोष दासरवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करून त्याला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली आहे. संतोष दासरवार यांनी विविध प्रसारमाध्यमांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधत अंडरब्रिजचे काम रखडल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून शिवाजीनगर अंडरब्रिज बंद असल्यामुळे सुमारे २२ गावांतील नागरिकांची वाहतूक प्रभावित झाली आहे. नागरिकांना पर्यायी मार्गाने मोठा फेरा मारून प्रवास करावा लागत असून वेळ आणि आर्थिक खर्चही वाढत आहे. याशिवाय शेतीच्या हंगामात खत, बियाणे, औषधे तसेच इतर शेतीविषयक साहित्याची वाहतूक करण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

- दोषी कंत्राटदारावर कारवाई करून ब्लॅकलिस्ट करण्याची शिक्षक नेते संतोष दासरवार यांची मागणी

उदयसिंह पाटील, अजित लकडे, सुहास चव्हाण पुन्हा आले मैदानात

सोलापूर : (स. गांवकरी)

वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, अजित लकडे, सुहास चव्हाण यांच्या शहरात विविध पोलीस ठाण्यात बदल्या करण्यात आल्या आहेत यामुळे हे तीन अधिकारी साइड पोस्टिंग ला झाले होते परंतु आता त्यांना पोलीस ठाणे मिळाल्यामुळे ते पुन्हा मैदानात आले आहेत.

सोलापूर पोलीस दलात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत.: पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी अनेकाना धक्का देत अंतर्गत बदल्यांचे आदेश काल जारी केले आहेत; यामुळे सोलापूर पोलीस दलात ‘कही खुशी कही गम’ असे वातावरण निर्माण झाले आहे.

सोलापूर शहर पोलीस दलात गुरुवारी (२ जुलै २०२६) मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी शहरातील १५ पोलीस निरीक्षकांच्या प्रशासकीय, तर २ अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून अंतर्गत बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. पोलीस आस्थापना मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार हे आदेश तातडीने लागू करण्यात आले आहेत. या बदल्यांमुळे पोलीस वर्तुळात कुठे आनंदाचे तर कुठे नाराजीचे वातावरण म्हणजेच ‘कही खुशी कही गम’ अशी स्थिती पाहायला मिळत आहे. अनेक महिने बाजूला (साइड पोस्टिंगला) म्हणजेच मानवी संसाधन विकास (वेल्फेअर) शाखेत कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक उदयसिंह शामराव पाटील यांची आता ‘जेल रोड पोलीस ठाण्याच्या’ वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदी (वपोनि) बदली करण्यात आली आहे. यापूर्वी पाटील यांनी विजापूर नाका पोलीस ठाणे आणि फौजदार चावडी ठाण्याची जबाबदारी सांभाळली होती. काही कारणास्तव त्यांना तेथून हटवण्यात आले होते. आर्थिक गुन्हे शाखेत असलेले पोलीस निरीक्षक अजित शंकर लकडे यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवत त्यांना ‘सदर बझार पोलीस ठाण्याचा’ पदभार (वरिष्ठ पोलीस निरीक्षक) देण्यात आला आहे. विजापूर नाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादा सोमनाथ गायकवाड यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदली झाली आहे. त्यांच्या जागी नियंत्रण कक्षातून सुहास भाऊराव चव्हाण यांची विनंतीवरून विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सुहास चव्हाण हे यापूर्वी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात कार्यरत होते. काही कारणामुळे त्यांना नियंत्रण कक्षेत पाठवले होते. जेल रोडचे दुय्यम पोलीस निरीक्षक भाऊराव श्रीधर बिराजदार यांच्याकडे आता ‘एमआयडीसी पोलीस ठाण्याचा’ वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यभार सोपवण्यात आला आहे.

सोलापूर शहरात वाहतूक नियंत्रण करण्याच्या कामात पोलीस निरीक्षक रवींद्रनाथ कृष्णा भंडारे हे काहीसे कमी पडल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळेच त्यांना शहर वाहतूक शाखेच्या (दक्षिण) पदावरून तातडीने हटवण्यात आल्याची चर्चा पोलीस वर्तुळात आहे. विशेष म्हणजे, त्यांची बदली करताना कोणत्याही पोलीस ठाण्याचे ‘फर्स्ट’ (वरिष्ठ पोलीस निरीक्षक) न करता, थेट सदर बझार पोलीस ठाण्यात ‘सेकंड’ म्हणजेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) म्हणून दुय्यम दर्जाची जबाबदारी देण्यात आली आहे. मुख्य प्रवासातून बाजूला करत त्यांना ही दुय्यम पोस्टिंग दिल्यामुळे या बदलीची शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.

पतीच्या जागेवर पत्नी!

पोलीस निरीक्षक उदयसिंह शामराव पाटील आणि पोलीस निरीक्षक वैष्णवी उदयसिंह पाटील हे पोलीस दलातील कर्तव्यदक्ष पती-पत्नी आहेत. मानव संसाधन विकास (वेल्फेअर) शाखेत कार्यरत असलेले उदयसिंह पाटील यांची जेल रोड पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदी बदली करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ते ज्या ‘वेल्फेअर’ शाखेत कार्यरत होते, ती जागा रिक्त झाल्यावर आता त्यांच्याच पत्नी म्हणजेच पोलीस निरीक्षक वैष्णवी पाटील यांना विशेष शाखेतून आणून त्या जागेवर नियुक्ती देण्यात आली आहे. पतीच्या जागेवर आता पत्नी पोलीस दलाचा कारभार सांभाळणार असल्याने या ‘पाटील’ दाम्पत्याच्या बदलीची पोलीस वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

संगमनेर तालुक्यात 'खेत बचाओ अभियान'

१७० हून अधिक शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचे मार्गदर्शन!

संगमनेर : (स. गांवकरी)

भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर) यांच्या देशव्यापी 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत आयसीएआर-केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था (सीरकोट), मुंबई यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात विविध गावांमध्ये दोन दिवसीय शेतकरी जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या अभियानाचा मुख्य उद्देश शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करणे, पीक उत्पादन वाढविणे तसेच जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी मृदा व अन्नद्रव्यांचे कार्यक्षम व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे हा होता. अभियानादरम्यान शेतकऱ्यांना 'खेत बचाओ अभियान'ची उद्दिष्टे आणि त्याचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले. तांत्रिक सत्रांमध्ये मृदा परीक्षणावर आधारित अन्नद्रव्य व्यवस्थापन, संतुलित खतांचा वापर, सूक्ष्मजीवाधारित जैवखते, जीवामृत, बीजामृत आणि हिरवळीच्या खतांचा पर्यावरणपूरक वापर याविषयी माहिती देण्यात आली. तसेच जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव मृदेची सुपीकता वाढविणे, अन्नद्रव्यांचे पुनर्चक्रण, सेंद्रिय पदार्थांचे विघटन आणि दीर्घकालीन मृदा आरोग्य सुधारण्यात कशी महत्त्वाची भूमिका बजावतात, याबाबत शास्त्रज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान सूक्ष्मजीवांच्या साहाय्याने ऊसाच्या पाचटाचे जलद विघटन तसेच रायझोबियमद्वारे बियाणे प्रक्रिया यांची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक व पर्यावरणपूरक शेती तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळाली.

हा जनजागृती कार्यक्रम चास, वावी, पिंपळे, पिंपरी, कसारे, सायखिंडी, सोनोशी, नान्नज-धुमाळा आणि खांडगाव या गावांमध्ये आयोजित करण्यात आला. या उपक्रमात १७० हून अधिक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध विषयांवर शास्त्रज्ञांशी संवाद साधला. आयसीएआर-सीरकोटच्या तज्ज्ञ पथकातील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अजिनाथ डूकरे, तसेच तांत्रिक अधिकारी श्री. राजेश नरकर, श्री. मनोज आंबरे आणि श्री. निशांत कांबळी यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रेलीगेअर ॲग्रो लाईफ बायो-सायन्स प्रा. लि., संगमनेर यांचे सहकार्य लाभले. शेतकरी आणि संशोधन संस्था यांच्यात समन्वय साधून आधुनिक तंत्रज्ञान ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यात संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली.

थोडक्यात पण महत्वाचे

सेवानिवृत्त पोलीस निरीक्षकांकडून विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप

अकोले (स. गांवकरी) : रुंभोडी येथील सेवानिवृत्त, सुपुत्र दातृत्ववान पोलीस निरीक्षक श्री. पंढरीनाथ निवृत्ती वाकचौरे व त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, रुंभोडी येथील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी श्री. वाकचौरे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडत शिक्षणाचे महत्त्व, शिस्त, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या प्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. विठ्ठल वाकचौरे, अभियंता केशव वाकचौरे, रुंभोडीचे सरपंच रवींद्र मालुंजकर, पोलीस पाटील गोरक्ष शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष पुरी, उपाध्यक्ष सतीश शिंदे, हरिभाऊ शिंदे, मुख्याध्यापिका श्रीमती हांडे मॅडम तसेच श्री. भोसले सर व इतर शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शाळा, शालेय व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने श्री. पंढरीनाथ वाकचौरे व त्यांच्या कुटुंबीयांचे या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेसची मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहीम बैठक रविवारी

कळवण (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहीम तसेच संघटनात्मक तालुका आढावा बैठक रविवार, दि. ५ रोजी सकाळी १० वाजता दळवट येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थान कळवण-सुरगाणा मतदारसंघाचे आमदार नितीन पवार भूषविणार असून, जिल्हाध्यक्ष दिलीप खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा होणार असल्याची महिती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे व समता परिषदेच्या तालुकाध्यक्ष शशी बागुल यांनी दिली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका व पक्षसंघटना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेचा आढावा घेऊन नव्या मतदारांची नोंदणी, त्रुटी दूर करणे तसेच प्रत्येक बूथवर पक्ष संघटना अधिक बळकट करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय संघटनात्मक बांधणी, पक्ष विस्तार, विविध आघाड्यांच्या कामकाजाचा आढावा आणि आगामी कार्यक्रमांचे नियोजन यावरही सविस्तर चर्चा होणार आहे.

दोन शाळांमधून सुमारे २ लाख ३४ हजार रु. अन्नसाठा जप्त

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार २ जुलै २०२६ रोजी नांदेड येथे शालेय पोषण आहाराची तपासणी करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे यांनी सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी व्ही. एस. लोंढे, अरुण तम्मडवार, अमृता दुधाटे आणि अ. नं. गिरी यांच्या पथकासह दोन शाळांमधील पोषण आहार विभागाची तपासणी करून विविध अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेतले. बाबानगर येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात रिफाइंड सोयाबीन तेल, सोया वडी, तांदूळ आणि तूर डाळ यांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तसेच सोया वडी या अन्न पदार्थाचा उर्वरित साठा (३९८ किलो), तांदूळ (२,९९८ किलो) आणि तूर डाळ (९९८ किलो) असा एकूण २ लाख २४ हजार ५३० रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. यानंतर वसंतनगर येथील राजर्षी शाहू विद्यालयात सोया वडी, तांदूळ आणि मूग डाळ यांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. येथे उर्वरित ९८ किलो सोया वडीचा ९ हजार ८०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. प्रयोगशाळेतील विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही कारवाई सहायक आयुक्त सु. द. जिंतुरकर तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे व त्यांच्या पथकाने पार पाडली.

पुरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल तैनात

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) :राज्यात मान्सून काळात उद्भवणाऱ्या संभाव्य पूरपरिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी मराठवाडा विभागासाठी धुळे येथील राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची एक तुकडी नांदेड येथे १ जुलै २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत सुसज्ज साधनसामग्रीसह तैनात करण्यात आली आहे. शासनाच्या आदेशानुसार समादेशक तथा नियंत्रण अधिकारी, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आर. डी. पवार यांच्या नेतृत्वाखाली ३ अधिकारी व ३३ जवानांची ही तुकडी १ जुलै रोजी नांदेड येथे दाखल झाली. मागील चार वर्षांपासून मान्सून काळात मराठवाड्यातील पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी धुळे येथील ही तुकडी नांदेड येथे तैनात केली जाते. याचबरोबर नागपूर येथील एक तुकडी गडचिरोली जिल्ह्यात कार्यरत असते. मागील वर्षी मुखेड, देगलूर, धर्माबाद, नायगाव, नांदेड, अर्धापूर आदी भागांमध्ये या तुकडीने मोठ्या प्रमाणात शोध व बचावकार्य केले होते.

पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी माऊली मंदिरातील सुरक्षेचा आढावा घेतला. या वेळी देवस्थान तर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख ॲड राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य लोंढे कबीरबुवा, पुरुषोत्तम दादा पाटील, पोलीस अधिकारी उपस्थित होते.

अमरनाथ यात्रेसाठी भारती एअरटेलचा नेटवर्क कव्हरेजचा विस्तार

जम्मू/श्रीनगर : (स. गांवकरी)

भारती एअरटेलने अमरनाथ यात्रेसाठी आपल्या मोबाईल नेटवर्कचा विस्तार केल्याची घोषणा केली आहे. यामुळे यात्रेकरू, सुरक्षा दल आणि स्थानिक प्रशासनाला अधिक चांगली आणि विश्वासार्ह मोबाईल कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. एअरटेलने चंदनवाडी, पिस्सू टॉप आणि बेताब व्हॅली येथे नवीन मोबाईल नेटवर्क साइट्स सुरू केल्या आहेत. त्यामुळे पहलगाम मार्गावर आता मजबूत नेटवर्क उपलब्ध झाले आहे. यापूर्वीच बालटाल मार्गावर एअरटेलची सेवा उपलब्ध होती.

या विस्तारामुळे पवित्र अमरनाथ गुहेपर्यंतच्या संपूर्ण प्रवासात यात्रेकरूंना अखंड मोबाईल कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. अमरनाथ यात्रेदरम्यान दळणवळणाची सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी एअरटेलने संबंधित सरकारी यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने हे नेटवर्क उभारले आहे. या विस्तारित नेटवर्कमुळे लाखो भाविकांना विश्वासार्ह व्हॉइस आणि डेटा सेवा मिळेल. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधणे अधिक सोपे होईल आणि डिजिटल सेवांचा अधिक चांगला लाभ घेता येईल.

भारती एअरटेलचे जम्मू-काश्मीर विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीओओ) विक्रम आरएस म्हणाले, "एअरटेलमध्ये आम्ही कठीण भौगोलिक भागातही लोक, समुदाय आणि अत्यावश्यक सेवांना जोडण्यासाठी कायम कटिबद्ध आहोत. अमरनाथ यात्रेसाठी पहलगाम आणि बालटाल या दोन्ही मार्गांवर नेटवर्कचा विस्तार करणे हे जम्मू-काश्मीरमधील आमच्या सातत्यपूर्ण गुंतवणुकीचे आणि यात्रेकरू, सुरक्षा दल तसेच प्रशासनाला संपूर्ण यात्रेदरम्यान विश्वासार्ह कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे."

आस्ताना ए हजरत सय्यद दातापीर दर्गाच्या ८१ व्या उरुसास ७ जुलै पासून उत्साहात प्रारंभ होणार

अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोट सोलापूर रोड येथील आस्ताना-ए-हजरत सय्यद दातापीर शाह कादरी रह. अक्कलकोट शरीफ दर्गाहचा 81 वे उर्स ७ जुलै ते ९ जुलै 2026 पर्यंत संपन्न होणार आहे अशी माहिती दर्गा उरूस समितीने दिली. अक्कलकोट सोलापूर रोड येथील आस्ताना-ए-हजरत सय्यद दातापीर शाह कादरी रह. अक्कलकोट शरीफ दर्गाहचा 81 वे उर्स मंगळवार, दि. ७ जुलै 2026 पासून प्रारंभ होत असून तीन दिवस चालणाऱ्या या उर्स निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दर्गाहचे पीर-ए-तरीकत औलाद-ए-गौसे आजम सय्यदुना हुजूर सय्यद शाह दातापीर शाह कादरी साहेब किबला सज्जादा नशीन बारगाहे ऐ हाजा व पीर-ए-तरीकत औलाद-ए-गौसे आजम हजरत सय्यद शाह मस्तूर शाह कादरी साहेब किबला यांनी दिली. दर्शनासाठी व प्रसाद घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन दर्गाह प्रमुख हजरत सय्यद शाह दातापीर गुलाम आलमनवाज शाह कादरी किबला यांनी केले आहे. अक्कलकोट शहर व तालुक्याचे सर्वधर्मसमभावाचे व जातीय सलोख्याचे मोठे प्रतीक असलेल्या दातापीर दर्गाहच्या उर्स निमित्त ७ जुलै मंगळवार रोजी संदल [गंध],८ जुलै बुधवार रोजी चिरागा रोशन [दीपोत्सव व उर्स] व ९ जुलै गुरुवार रोजी जियारत [प्रसाद] असे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

उर्सच्या तिन्ही दिवशी दिवसभर महाप्रसादाचा [लंगर] आयोजन दर्गाहच्या वतीने करण्यात येणार आहे. ७ जुलै,८ जुलै व ९ जुलै या तीन दिवस चालणाऱ्या उर्स व भजन, कव्वाली, नात, धार्मिक कार्यक्रमांचा आणि तिन्ही दिवस चालणाऱ्या महाप्रसादाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही दर्गाहचे प्रमुख हजरत दातापीर शाह कादरी साहेब यांनी केले आहे. यावेळी हजरत दातापीर बाबांच्या उर्समध्ये हिंदू-मुस्लिम धर्मियांसह सर्वच धर्मीय बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात. यामुळे अक्कलकोटमधील सामाजिक एकतेचे दर्शन घडते.

सोलापुरातील नामवंत वकिलास चपराक आंतरजिल्हा टोळीतील आरोपीचा १३ लाखांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात जामीन फेटाळला

सोलापूर : (स. गांवकरी)

मूळ फिर्यादीच्या प्रभावी कायदेशीर लढ्यामुळे १३ लाखांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

सुमारे १३ लाख रुपयांच्या आर्थिक व्यवहार व फसवणुकीशी संबंधित गंभीर प्रकरणात आरोपी क्र.१ अभिजित वसंत शेंडगे याने दाखल केलेला जामीन अर्ज मान. न्यायालयाने नामंजूर केला आहे.या प्रकरणात मूळ फिर्यादीच्या वतीने ॲड.प्रशिक राजेंद्र सोनकांबळे, बी.ए. एलएल.बी. व पदवीधर तसेच माहिती अधिकार कार्यकर्ता, यांनी स्वतः सखोल अभ्यास करून मान. न्यायालयात प्रभावीपणे बाजू मांडली. आरोपीच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एम.एम.थोबडे यांनी जामीन मंजूर करण्यासाठी युक्तिवाद केला होता.मात्र मूळ फिर्यादीच्या वतीने ॲड. प्रशिक सोनकांबळे यांनी सदर प्रकरणातील महत्त्वपूर्ण

पुरावे, न्यायनिवाडे आणि उपलब्ध दस्तऐवज मेह.न्यायालयासमोर सादर करून आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली.

यावेळी फिर्यादी पक्षाने एकुन १३ लाख रुपयांच्या व्यवहारासंदर्भातील बँक व्यवहारांची कागदपत्रे, सीसीटीव्ही फुटेज, कॉल रेकॉर्डिंग, प्रतिज्ञा पत्रे तसेच इतर दस्तऐवज तसेच मेह.सर्वोच्च न्यायालय व विविध उच्च न्यायालयांचे महत्त्वपूर्ण न्यायनिवाडे न्यायालयात दाखल केले. आरोपीला जामीन मंजूर झाल्यास साक्षीदारांवर दबाव आणण्याची, पुराव्यांमध्ये हस्तक्षेप करण्याची आणि अशा प्रकारचे गुन्हे पुन्हा करण्याची शक्यता असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. विशेष म्हणजे या प्रकरणात दोषारोप पत्र दाखल झालेले असतानाही केवळ दोषारोप पत्र दाखल झाल्याच्या आधारावर जामीन मंजूर करता येत नाही.हा महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा फिर्यादी पक्षाने मेह.सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांच्या आधारे प्रभावीपणे मांडला.न्यायालयाने प्रकरणातील पुरावे, आरोपीविरुद्ध उपलब्ध साहित्य, इतर गुन्ह्यांची पार्श्वभूमी आणि फिर्यादी पक्षाने सादर केलेल्या न्यायनिवाड्यांचा विचार करून आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला. एका तरुण कायदेविषयक पदवीधर म्हणून ॲड. प्रशिक राजेंद्र सोनकांबळे यांनी स्वतः सखोल कायदेशीर संशोधन करून महत्त्वपूर्ण दस्तऐवजी पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, बँक व्यवहारांची माहिती, कॉल रेकॉर्डिंग आणि न्यायनिवाडे न्यायालयासमोर मांडत प्रकरणाचा प्रभावी पाठपुरावा केला. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि प्रामाणिकपणे परिश्रमपूर्वक मांडणी केल्यामुळे आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर झाल्याची चर्चा न्यायवर्तुळात होत आहे.

ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे रक्तांचल सिझन ३ सह पुनरागमन

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

ॲमेझॉन एमएक्स प्लेअर, भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज त्याच्या प्रेक्षक-पसंतीचा राजकीय गुन्हेगारी थरारपट, रक्तांचलच्या बहुप्रतिक्षित तिसऱ्या सिझनची घोषणा केली. ज्यात भारतीय स्ट्रीमिंगच्या सर्वात मनोरंजक प्रतिस्पर्ध्यांपैकी एकाच्या पुढच्या अध्यायात एक मनोरंजक प्री-टीझर आहे. रितम श्रीवास्तव दिग्दर्शित, रक्तांचल सिझन 3 मध्ये राजेश कुमार, करण पटेल, विक्रम कोचर आणि माही गिल यांच्या प्रमुख भूमिकांसह निकितिन धीर तसेच क्रांती प्रकाश झा त्यांच्या लोकप्रिय मुख्य भूमिकांमध्ये पुन्हा एकदा झळकले आहेत. सत्य घटनांपासून प्रेरित, नाट्यमय मालिका पूर्वांचलच्या, तीव्र पार्श्वभूमीवर आधारित आहे विजय सिंग आणि वसीम खान यांच्यातील ॲक्शन-पॅक फेस-ऑफ सुरू ठेवून फ्रँचायझीमधील सर्वात स्फोटक भाग असल्याचे वचन देते. प्रेक्षकांना पुढे काय आहे याची झलक देताना, पहिले दर्शन अशा अध्यायाचे संकेत देते जो पूर्वीपेक्षा अधिक अस्थिर, अधिक वैयक्तिक आणि अधिक धोकादायक आहे. सन 2020 मध्ये रक्तांचलचा पहिला सिझन प्रदर्शित झाल्यापासून, विजय सिंग तसेच वसीम खान यांच्या कथेला त्यांच्या जागतिक उभारणीसाठी, भावनिकदृष्ट्या प्रेरित संघर्षासाठी आणि 80च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळातील सत्तासंघर्षाचे चित्रण करण्यासाठी निष्ठावान प्रेक्षक मिळाले.

ॲमेझॉन प्राईम डे निमित्त वनप्लसच्या आकर्षक सवलती

पुणे : (स. गांवकरी)

वनप्लसने ॲमेझॉन प्राईम डे २०२६ निमित्त विविध स्मार्टफोन, टॅब्लेट आणि ध्वनी उपकरणांवर विशेष सवलती जाहीर केल्या आहेत. या सवलती ४ जुलैच्या मध्यरात्रीपासून लागू होणार असून ग्राहकांना किंमत कपात, बँक सवलत आणि विनाव्याज हप्त्यांच्या सुविधा मिळणार आहेत. यंदाच्या विक्रीत वनप्लस १५ आर, वनप्लस १३ एस, वनप्लस १३, वनप्लस नॉर्ड सीई६, वनप्लस पॅड ४ आणि वनप्लस नॉर्ड बड्स ४ ही उत्पादने विशेष आकर्षण ठरणार आहेत. विशेष म्हणजे, वनप्लस १३ हा स्मार्टफोन आतापर्यंतच्या सर्वात कमी ४९,९९९ रुपयांच्या प्रभावी किमतीत उपलब्ध होणार आहे. वनप्लस १५ आरवर ३ हजार रुपयांची किंमत कपात आणि ३ हजार रुपयांपर्यंत बँक सवलत मिळून त्याची प्रभावी किंमत ४८,९९९ रुपये इतकी राहणार आहे. तसेच वनप्लस १३ एसवर ५ हजार रुपयांची किंमत कपात आणि ३ हजार रुपयांची बँक सवलत मिळून तो ४६,९९९ रुपयांत उपलब्ध होईल. नॉर्ड मालिकेतील वनप्लस नॉर्ड सीई ६ हा स्मार्टफोन २९,९९९ रुपयांत, तर नॉर्ड सीई६ लाइट २२,९९९ रुपयांच्या प्रारंभिक प्रभावी किमतीत उपलब्ध होणार आहे.

येरवडा कारागृह : कुटुंबीयांसाठी आरोग्य शिबिर

पुणे : (स. गांवकरी)

राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधत सह्याद्री हॉस्पिटल, शास्त्रीनगर, येरवडा (मणिपाल हॉस्पिटल्स नेटवर्क) यांच्या वतीने येरवडा मध्यवर्ती कारागृह आणि येरवडा खुले कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दोन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी व वैद्यकीय सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले. १ व २ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी हे चोवीस तास जबाबदारीचे कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी व्हावी, विविध आजारांचे लवकर निदान व्हावे आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मा. डॉ. सुहास वारके (आयपीएस), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, मा. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, तसेच कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. शिबिराचे उद्घाटन कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी कारागृह कर्मचारी वर्षभर अत्यंत तणावपूर्ण वातावरणात सेवा बजावत असल्याने त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी अशा स्वरूपाच्या आरोग्य शिबिरांचे आयोजन ही काळाची गरज असून भविष्यातही अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे होते. सह्याद्री हॉस्पिटलच्या संचालिका नेहा सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पथकाने शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले.

"निरोगी कर्मचारी, सशक्त संस्था, निरोगी समाज" या संकल्पनेवर आधारित या शिबिरात विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभागी होत मोफत तपासणी व वैद्यकीय मार्गदर्शन केले.

अलंकापुरीत इंद्रायणी नदीला जल प्रदूषणाचा विळखा ; इंद्रायणी नदी फेसाळल्याने संताप

आळंदी : (स. गांवकरी)

- जलपर्णी वाहू लागली; ठेकेदाराचा देयक मागणीचा मार्ग मोकळा; नागरिकांत नाराजी
- पिंपवड महापालिकेसह जिल्हा प्रशासनाचे जल प्रदूषण रोखण्यास अपयश

येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पवित्र इंद्रायणी नदीला वाढत्या अस्वच्छतेने, नदीतील जल प्रदूषणाने, जलपर्णीच्या विळख्याने अपवित्रतेचे ग्रहण लागले आहे. जल प्रदूषणासह जलपर्णीचा विळखा इंद्रायणी नदीला कायम आहे. मात्र वाढत्या पावसाच्या पाण्याने जलपर्णी आणि फेसाळलेले पाणी फेसासह परिसरात वाऱ्याने इंद्रायणी नदीवर फेस तरंगत आणि जलपर्णी पाण्याचे प्रवाहात वाहून जात आहे.

आळंदीसह इंद्रायणी नदीवर ठिकठिकाणी जलपर्णी समस्यां जैसे थे आहे. केवळ जलपर्णी पुढे ढकलून ठेकेदार मोकळे होत असून जलपर्णी समस्यां नसून जलपर्णी हि पाणी प्रदूषण वाढल्याचा इंडीकेटर आहे. पिंपरी चिंचवड महानगरपरिषद हद्दीतून थेट रसायन व मैला मिश्रित सांडपाणी नदीत सोडले जात असल्याने नदी पांढऱ्या फेसाने पुन्हा फेसाळली. यात केमिकल, रसायन मिश्रित, सांडपाणी थेट सोडले जात असल्याने भाविक, नागरिकांत नाराजीचा सूर उमटत आहे. चार दिवसांवर येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान येऊन ठेपले असताना हि इंद्रायणी नदी परिसर अस्वच्छ असल्याने आळंदी देहू परिसर विकासाची शोकांतिका उघड झाल्याची चर्चा भाविकांतून होत आहे.

आळंदीतील इंद्रायणी नदीत जलपर्णी ची समस्यां देखील कायम असून आळंदीत सुरु होत असलेल्या प्रस्थान सोहळ्यातील हरिनाम सप्ताहाचे अनुषंगाने प्रभावी स्वच्छता, उपाय योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाजावर तसेच राज्य शासनाचे धोरणावर भाविक ताशेरे ओढत आहेत. इंद्रायणी घाटाची तोडफोड करून घाटाची विद्रुपता वाढवली असून वारकरी देखील यावर नाराजी व्यक्त करीत आहेत. मात्र याकडे शासनाची डोळेझाक होत आहे. इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्त साठी विविध सेवाभावी संस्थानी केलेले पाठपुरावा या मुळे शासनाचे लक्ष वेधले गेले. मात्र जलप्रदूषण रोखण्यासाठी चे उपाय योजना तोकड्या पडल्या आहेत. सिमेंटीकरण घाट विकासावर शासनाने लक्ष केंद्रित करून प्राधान्याने जलप्रदूषण रोखण्याचे उपाय योजना हाती घेण्याकडे दुर्लक्ष केल्याची भावना जोग महाराज प्रासादिक दिंडीचे मार्गदर्शक हभप विचारसागर महाराज लाहुडकर यांनी सांगितले. इंद्रायणी नदीचे जलप्रदूषण वाढल्याने भाविक, वारकरी आणि नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. पिंपवड महापालिका आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अंकुश प्रदूषण करणाऱ्या घटकांवर राहिला नसल्याने वारंवार नदी पांढऱ्या शुभ्र प्रदुषित पाण्याने फेसाळत असल्याचे दिसत आहे. आळंदीत इंद्रायणी नदीतून नगरपरिषदेच्या पाणी साठवण बंधाऱ्यात प्रचंड प्रदूषित पाणी, जलपर्णीसह महापालिका हद्दीतून येत आहे. इंद्रायणी नदीवरील पाणी साठवण बंधारा अनेक ठिकाणी दगड निखळले आहेत. यामुळे गळती असून सद्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न निकाली निघाला असला तरी नदीचे वाढते प्रदूषण तीर्थक्षेत्र विकासाची शोकांतिका उघड करीत आहे. देखभाल दुरुस्ती अभावी नदी वरील भक्त पुंडलिक मंदिर परिसरात पाणी साठविण्यावर बंधारा गळतीने मर्यादा आली आहे. येथील बंधा-यासह कोल्हापूर पद्धतीचे बंधा-याचे गळती रोखण्यासह पाणी पुरवठा केंद्राकडील बंधाऱ्याची देखभाल दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून इंद्रायणी नदीचे वाढते प्रदूषण रोखण्याची उपाययोजना करण्याचे मागणीसह नदी प्रदूषण रोखण्याची मागणी देहू रानजाई प्रकल्पाचे प्रमुख सोमनाथ आबा, नमामि इंद्रायणी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, आळंदी जनहित फाउंडेशन अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार यांना निवेदने देऊन केली आहे. मात्र पुणे जिल्हा प्रशासनाचे नदी प्रदूषण रोखण्याचे उपाय योजनांकडे दुर्लक्ष होत असल्याने नदी प्रदूषणाची पातळी हि खूप वाढली आहे.

पिंपरी महापालिकेने इंद्रायणी नदीतील जलपर्णी काढण्याचे काम अगदी संथ झाले. आता पाऊस सुरु झाल्याने महापालिका हद्दीतील जलपर्णी पावसाचे पाण्यात वाहून येत आहे. पालखी सोहळ्याचे गांभीर्य लक्षांत घेऊन तसेच तीर्थक्षेत्राचे महत्त्व लक्षांत घेऊन विकास कामे गतीने होणे आवश्यक असल्याने याकडे दुर्लक्ष होत आहे. आळंदी स्मशान भूमी परिसरातील नदीत मोठ्या प्रमाणात राडा रोडा, जलपर्णी वाहून आली आहे. परिसरातील नागरिकांना डासांचे त्रासाने गैरसोयीस सामोरे जावे लागत आहे. येथे नदीत राडा रोडा साचल्याने तसेच नदीत मोठ्या प्रमाणात राडा रोडा टाकला जात असल्याने नदीचे पात्र उधळ झाले असून गवताचे प्रमाण वाढले आहे. घाटाचे विकसित ठिकाणी सांडपाणी नाली टाकण्यासाठी इंद्रायणी नदी घाटाची तोडफोड करण्यात आली असून घाटाचे विद्रुपीकरण झाल्याने अनेकांनी प्रशासनाचे कामात नियोजनाचा अभावाने नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्षाने इंद्रायणी नदीचे प्रदूषणात वाढ झाली आहे. नदीतील जलप्रदूषित करणाऱ्या घटकावर गुन्हे दाखल करून कारवाई अभावी नदी प्रदूषण परिसरात वाढले आहे. आळंदीला पाणी पुरवठा केंद्रात येणारे पाणी देखील प्रचंड प्रदूषित झाल्याने आळंदी नगरपरिषदेस अखेर भामा आसखेडच्या पाण्याची मागणी करून शुद्धीकरणावर यंत्रणेवरील ताण कमी करावा लागला.

थोडक्यात पण महत्वाचे

आमदार अंतापूरकर यांच्या विरुद्ध आक्षेपार्ह टिप्पणी; गुन्हा दाखल करा

बिलोली (स. गांवकरी) : देगलूर - बिलोलीचे विद्यमान आमदार जितेश अंतापूरकर यांनी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण लागू करण्यासंदर्भात सभागृहात आपली भूमिका मांडली असून याबाबत काही समाजकंटकानी समाजमाध्यमे व सार्वजनिक व्यासपीठावर अश्लील, अपमानास्पद आणि आक्षेपार्ह भाषेचा वापर करीत आहेत,यामुळे समाजामध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे.म्हणून अशा व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करून आमदार अंतापूरकर यांना (वाय प्लस) दर्जाची सुरक्षा पुरविण्याची मागणी केली जात आहे. सद्यस्थीत राज्यात गाजत असलेल्या अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणचा कायदा लागू करण्याबाबत राज्यभरातून मातंग समाज एकटावला आहे, याबाबत आमदार अंतापूरकर यांनी महाराष्ट्र विधानसभेत त्यांची घटनात्मक व लोकप्रतिनिधी म्हणून भूमिका मांडली आहे. परंतु, सदर भूमिकेनंतर काही व्यक्तींनी समाजमाध्यमे तसेच विविध सार्वजनिक माध्यमांद्वारे आमदार यांच्या विरुद्ध अश्लील, खालच्या दर्जाची, मानहानीकारक व चिथावणीखोर भाषा वापरून शिवीगाळ केली आहे. अशा प्रकारच्या कृत्यामळे सामाजिक तेढ निर्माण होण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा कृत्यामुळे लोकशाही मूल्यांनाही धक्का पोहोचत आहे.

फ्लिपकार्ट GOAT सेलमध्ये Ai+ स्मार्टफोनची मोठी ऑफर



बिलोली (स. गांवकरी) : Ai+ स्मार्टफोनने फ्लिपकार्टच्या बहुप्रतीक्षित GOAT सेलमध्ये आपल्या स्मार्टफोन, वेअरेबल्स आणि AIoT उत्पादनांवर विशेष ऑफर्स जाहीर केल्या आहेत. फ्लिपकार्ट प्लस सदस्यांसाठी 3 जुलैपासून आणि सर्व ग्राहकांसाठी 4 जुलैपासून सुरू होणाऱ्या या सेलमध्ये Ai+ Pulse 2 हा स्मार्टफोन आतापर्यंतच्या सर्वात कमी ₹8,999 या किमतीत उपलब्ध होणार आहे. Pulse 2 मध्ये 6.745 इंचाचा HD+ डिस्प्ले, 120Hz रिफ्रेश रेट, Unisoc T7250 ऑक्टा-कोर प्रोसेसर, 50 मेगापिक्सेल AI रिअर कॅमेरा, 8 मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा, 6000mAh बॅटरी, 18W फास्ट चार्जिंग आणि Android 16 आधारित NxtQuantum OS देण्यात आले आहे. हा स्मार्टफोन 6GB पर्यंत RAM आणि 128GB स्टोरेजसह उपलब्ध असून, स्टोरेज 1TB पर्यंत वाढवता येते. यामध्ये IP64 डस्ट व वॉटर रेझिस्टन्स आणि साइड-माउंटेड फिंगरप्रिंट स्कॅनरची सुविधाही आहे.

रामानंद सागर यांच्या कालजयी मालिकेचे रात्री ८ वाजता प्रसारण

नाशिक (स. गांवकरी) : भारतातील लोकप्रिय विनामूल्य मनोरंजन वाहिनी सोनी पलवर ६ जुलैपासून रामानंद सागर यांची अजरामर 'रामायण' मालिका पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सोमवार ते शनिवार दररोज रात्री ८ वाजता ही कालजयी मालिका प्रसारित होणार असून, नव्या पिढीला भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि मूल्यांची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न आहे. १९८७ मध्ये प्रथम प्रसारित झालेल्या 'रामायण'ने भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासात एक वेगळाच अध्याय लिहिला होता. त्या काळात रविवारी सकाळी संपूर्ण देश ही मालिका पाहण्यासाठी टीव्हीसमोर बसत असे. ७८ भागांच्या या मालिकेने केवळ मनोरंजनच केले नाही, तर भारतीय कुटुंबांना श्रद्धा, संस्कार आणि भक्तीच्या धाग्यात एकत्र बांधले. 'हनुमान' आणि 'यशोमती मय्या' यांसारख्या भक्तिमय कार्यक्रमांना मिळालेल्या प्रतिसादानंतर सोनी पलने आता 'रामायण'चे प्रसारण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, माता सीतेचे त्यागमय व्यक्तिमत्त्व, लक्ष्मणाची निष्ठा आणि भगवान हनुमानांची अखंड भक्ती यांमधून आजच्या धावपळीच्या जीवनात मनःशांती, संयम आणि सकारात्मकतेची प्रेरणा मिळणार आहे. या मालिकेबाबत सोनी पलच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, "'रामायण' ही केवळ एक कथा नसून भारताच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. ती आजही भक्ती, एकात्मता आणि जीवनमूल्यांची प्रेरणा देते. प्रत्येक घरापर्यंत अर्थपूर्ण आणि मनाला स्पर्श करणारे मनोरंजन पोहोचवण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा हा भाग आहे." भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा मानली जाणारी 'रामायण' मालिका ६ जुलैपासून दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता सोनी पलवर प्रेक्षकांना पाहता येणार आहे.

एचएमएचकडून ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरचा विस्तार

पुणे : (स. गांवकरी)

के-12 शिक्षण तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित कंपनी एचएमएचने आज पुण्यातील आपल्या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरच्या (जीसीसी) विस्ताराची घोषणा केली आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक सकारात्मक परिणाम निर्माण करण्याच्या उद्देशाने हे सेंटर सातत्याने प्रगती आणि विकास करत आहे आणि आता नवीन व मोठ्या कार्यालयात स्थलांतरित होत आहे.

पुण्यातील शिवाजीनगर येथील हे नवीन कार्यालय आता सुरू झाले असून 24,000 चौरस फूट क्षेत्रफळात विस्तारलेले आहे. यामध्ये 230 हून अधिक कर्मचाऱ्यांसाठी आसनक्षमता, कोलाबोरेटिव्ह (एकत्रित काम करण्यासाठी) आणि हायब्रीड वर्कस्पेसेस, तसेच भविष्यातील वाढीसाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. यामुळे पुणे टीमला नवीन प्राधान्यक्रम आणि संधींवर काम करण्यासाठी आवश्यक जागा आणि पायाभूत सुविधा मिळणार आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद शाळांची उल्लेखनीय कामगिरी

५ वी व ८ वी मिळून ३९५ विद्यार्थी पात्र : इयत्ता ५ वीमध्ये ३८४ तर इयत्ता ८ वीमध्ये ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

ठाणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये जिल्हा परिषद ठाणेच्या शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्ह्यातील एकूण ३९५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून, त्यामध्ये इयत्ता ५ वीचे ३८४ आणि ८ वीचे ११ विद्यार्थी समाविष्ट आहेत. इयत्ता ५ वीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातील ६६० शाळांमधील ५,०१९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४,६७० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. एकूण ३८४ विद्यार्थी पात्र ठरले असून १५२ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. तालुकानिहाय निकालामध्ये शहापूर तालुक्याने सर्वाधिक २५६ विद्यार्थी पात्र जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले आहे. मुरबाड तालुक्यात ६७, भिवंडीमध्ये ३४, कल्याणमध्ये १६ आणि अंबरनाथमध्ये ११ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. तसेच, इयत्ता ८ वीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातील ८० शाळांमधील ६८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६१५ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. एकूण ११ विद्यार्थी पात्र ठरले असून १० विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळविली आहे. इयत्ता ८ वीमध्ये शहापूर तालुक्यातील ८ विद्यार्थी पात्र ठरले असून ७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. मुरबाड तालुक्यात २ आणि अंबरनाथ तालुक्यात १ विद्यार्थी पात्र ठरला आहे. या यशामागे विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापकांचे नियोजन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण, मार्गदर्शन वर्ग आणि सराव चाचण्यांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असल्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी सांगितले.

"जिल्हा परिषद शाळांतील ३९५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवून जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. विशेषतः शहापूर तालुक्याने केलेली उल्लेखनीय कामगिरी प्रेरणादायी आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्पर्धात्मक तयारी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असून भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा परीक्षांमध्ये यश संपादन करावे, यासाठी शहापूर पॅटर्न राबविण्यात येणार आहे तसेच आवश्यक सर्व सहकार्य आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील." – ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव

हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त किनवटमध्ये ९ हजार वृक्ष लागवडीचा शुभारंभ

किनवट : (स. गांवकरी)

हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अटल आनंद घनवन योजना २०२६ आणि 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' अभियानांतर्गत सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांच्या वतीने किनवट नगरपरिषदेच्या डम्पिंग ग्राउंड परिसरात ३० आर क्षेत्रात ९ हजार वृक्षांची लागवड करून घनवन विकसित करण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सुजाता एंड्रलवार यांच्या हस्ते स्मृतिफलकाचे अनावरण व वृक्षारोपण करून झाले. यावेळी सामाजिक वनीकरण विभागातर्फे नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष पठाण मोहम्मद हसन खान तसेच उपस्थित नगरसेवकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष पठाण मोहम्मद हसन खान, रोहन एंड्रलवार, नगरसेवक अभय महाजन, शिवसेना (उबाठा) शहरप्रमुख तथा नगरसेवक प्रशांत कोरडे, बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानिवार, पाणीपुरवठा सभापती निसार भाटी, नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार, नगरसेवक प्रतिनिधी प्रभू कोल्हे, किरण कलगोटवार, दत्ता कोल्हे, वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एच. संघई, वनपाल प्रकाश सूर्यवंशी, वनरक्षक सुनील खामकर, सारिका माहुरे, श्रीमती गीते, नगरपरिषदेचे कर्मचारी, नागरिक, कार्यकर्ते तसेच पत्रकार विजय जोशी व गंगाधर कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगराध्यक्षा सुजाता एंड्रलवार यांनी स्व. वसंतराव नाईक यांनी शेती, जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनासाठी दिलेले योगदान प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

त्यांच्या जयंतीनिमित्त सुरू करण्यात आलेला हा वृक्षारोपण उपक्रम किनवट शहराच्या पर्यावरण संतुलनासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. डम्पिंग ग्राउंडचे रूपांतर घनवनात करून शहराला भविष्यात ऑक्सिजन झोन उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

भिवंडीत होमविस्टाचे अत्याधुनिक उत्पादन केंद्र

मुंबई / बेंगळुरू : (स. गांवकरी)

भारतातील होम इंटिरिअर्स क्षेत्रात तंत्रज्ञानाधारित आणि संघटित उत्पादन व्यवस्थेकडे वेगाने वाटचाल सुरू असून, त्याला बळ देण्यासाठी होमविस्टाने महाराष्ट्रातील भिवंडी येथे ५६ हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे अत्याधुनिक उत्पादन व वेअरहाउसिंग केंद्र सुरू केले आहे. या केंद्रातून प्रथमच होमलेन आणि डिझाइनकॅफे या दोन्ही ब्रँड्सचे उत्पादन एकाच व्यवस्थेखाली केले जाणार असून, उत्तर व पश्चिम भारतातील ग्राहकांना अधिक अचूक, पारदर्शक आणि दर्जेदार सेवा मिळणार आहे. या नव्या सुविधेमुळे कंपनीची एकूण उत्पादन क्षमता दरमहा सुमारे १,२०० घरांपर्यंत वाढली असून, भविष्यात ती आणखी ४० टक्क्यांनी वाढविण्याची क्षमता उपलब्ध आहे. मुंबई, पुणे, दिल्ली-एनसीआर, जयपूर, चंदीगड, अहमदाबाद तसेच टियर-२ शहरांमधील संपूर्ण घरांच्या इंटिरिअर्स प्रकल्पांना या केंद्रातून सेवा दिली जाणार आहे. या केंद्रामध्ये अत्याधुनिक सीएनसी मशिन्स, स्वयंचलित कटिंग व एज-बँडिंग प्रणाली, रोबोटिक फिनिशिंग तंत्रज्ञान, कन्व्हेयर-आधारित असेंब्ली लाईन्स तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डिजिटल उत्पादन प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मंजूर डिझाइनपासून अंतिम उत्पादनापर्यंत प्रत्येक टप्प्याचा डिजिटल मागोवा घेणे शक्य होणार आहे. होमलेनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सह-संस्थापक श्रीकांत अय्यर यांनी सांगितले की, ग्राहक आता केवळ आकर्षक डिझाइन नव्हे तर वेळेत काम, दर्जा आणि पूर्ण पारदर्शकतेची अपेक्षा ठेवतात.

'नेकेड अँड अफ्रेड : आदिमानव'चा विजेता ठरला पुण्याचा लहू उघडे

मुंबई : (स. गांवकरी)

वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या जगप्रसिद्ध साहसी सर्व्हायव्हल फ्रँचायझी 'नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव' च्या भारतीय आवृत्तीचा पहिला विजेता म्हणून पुण्यातील गिर्यारोहक लहू उघडे यांनी बाजी मारली आहे. एव्हरेस्ट सर करणारे लहू यांनी आपल्या अनुभव, चिकाटी आणि सर्व्हायव्हल कौशल्याच्या जोरावर हा मान पटकावला.

आशिया-पॅसिफिक प्रदेशात प्रथमच सादर झालेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील सहा स्पर्धकांना फिलिपाइन्समधील पालावानच्या दुर्गम जंगलात अत्यंत मर्यादित साधनसामग्रीसह राहण्याचे आणि अनेक कठीण आव्हानांचा सामना करण्याचे आव्हान देण्यात आले होते. कठोर परिस्थितीत टिकून राहणे, योग्य निर्णय घेणे आणि निसर्गाशी जुळवून घेणे या कसोट्यांवर स्पर्धकांची परीक्षा घेण्यात आली.

मास्टरकार्डच्या 'सिर्फ कार्ड नहीं, मास्टरकार्ड'सह रोजचा खर्च अधिक स्मार्ट आणि अधिक रिवॉर्डिंग क्षणांमध्ये बदलतो

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

अगदी वेगाने ऑनलाईन खरेदी करणारे खरेदीदार आणि विकेंड गेटअवेज पासून ते रोजची बीले, सणासूदीची खरेदी आणि रोजचा खर्च असो भारतीय लोक हे केवळ रोजच्या पेमेंट पेक्षा अधिकची अपेक्षा ठेवतात. याच गोष्टीचा लाभ घेत आज मास्टरकार्ड तर्फे 'सिर्फ कार्ड नहीं, मास्टरकार्ड' या मोहिमेच्या सुरुवातीची घोषणा केली असून या उत्साही मोहिमेच्या माध्यमातून कशा प्रकारे एका कार्डाचा उपयोग व्यवहार करण्यापेक्षा अधिक करु शकतो हे कळवत आहे. ही मोहिम भारतातील रोजच्या स्मार्ट खरेदीचा साथीदार म्हणून मास्टरकार्डला प्रस्थापित करत आहे, ज्यामुळे विश्वसनीय सुरक्षा, जागतिक पोहोच, चांगल्या ऑफर्स आणि रोजच्या कामातील संस्मरणीय अनुभव ग्राहकांना मिळतो.

अशा वेळी जेंव्हा भारतातील ग्राहक पूर्वीपेक्षा अधिक डिजिटल, अधिक जाणकार आणि पैशांची किंमत ओळखणारे झाले आहेत, तेव्हा पेमेंटचे पर्याय हे लोक कशा प्रकारे नियोजन करतात, खरेदी करतात, प्रवास करतात आणि स्वतःसाठी उपयोग करुन घेतात, याचाच एक भाग बनत चालले आहेत. ग्राहक आपल्या नेहमीच्या खर्चातून अधिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत असताना; मिळणाऱ्या ऑफर्स, रिवॉर्ड्स आणि पेमेंटचे विविध पर्याय समजून घेतांना अनेकदा गोंधळात पडलेले दिसू शकतात. त्यांना मूल्य शोधण्यासाठी, आत्मविश्वासाने पैसे भरण्यासाठी आणि प्रत्येक खरेदी अधिक सार्थक वाटेल अशा समृध्द अनुभवांचे दरवाजे खुले करण्यासाठी सोपे मार्ग हवे आहेत.

ही मोहीम आधुनिक भारतीय जीवनातील अगदी सहज ओळखता येतील अशा क्षणांवर आधारित नऊ शॉर्ट फिल्म्सद्वारे समोर येते—जसे की बिले भरणे, प्रवासाचे बुकिंग करणे, ईएमआयवर खरेदी करणे, 'टॅप टू पे' चा वापर करणे, मर्चंट ऑफर्सचा शोध घेणे, खास अनुभवांचा आनंद घेणे आणि सुरक्षितपणे ऑनलाईन व्यवहार करणे इत्यादी. प्रत्येक लघुपट मास्टरकार्डच्या वेगवेगळ्या फायद्यावर प्रकाश टाकण्यासाठी अगदी साध्या, दैनंदिन जीवनातील घटनांचा वापर करतो, ज्यामुळे ब्रँडचे आश्वासन प्रत्यक्ष, जवळचे आणि लक्षात ठेवण्यास सोपे बनते. एकत्रितपणे, हे लघुपट मास्टरकार्डला केवळ पाकिटातील एक कार्ड म्हणून नाही, तर ग्राहकांना दररोज अधिक हुशारीने, सुरक्षितपणे आणि अधिक चांगल्या प्रकारे खर्च करण्यास मदत करणारा एक भागीदार म्हणून सादर करतात.